

उस्ताद अल्लाउद्दीन खाँ

माझी कहाणी



अनुप्रासमाला


माझी कहाणी



जन्म : ?

मृत्यु ६-९-१९७२






माझी कहाणी

उस्ताद अल्लाउद्दीन खाँ

प्रास प्रकाशन



प्रास ३ रा

माझी कहाणी
उस्ताद अल्लाउद्दीन खाँ

अनुलेखन
शुभमय घोष
अनुवाद
अशोक शहाणे

पहिली खेप
आषाढी १९००

सजावट
वृंदावन दंडवते
मांडणी
अशोक शहाणे

छायाचित्रण
स्टुडिओ क्रिसेंट
ठसे
कौशल आर्ट्स

मुद्रक
चिं० स० लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ टिळक रस्ता
पुणें ४११ ०३०


प्रकाशक
अशोक शहाणे
३९ नाथमाधव
कांदिवली पूर्व
मुंबई ४०० ०६७

किंमत
बारा रुपये

यांचे आम्ही ऋणी आहोंत.

अन्नपूर्णादेवी
कुमुद मेहता
द्विजेंद्र विश्वास
सलिल घोष
नारायण उगार
पु० ल० देशपांडे
मदनलाल व्यास
रत्नाकर व्यास
शरद आपटे
प्रभाकर जोशी
सुरेश गोखले
सागरमय घोष
गौरकिशोर घोष
व्यंकटेश माडगुळकर
राजाराम माने
आकाशवाणी, पुणें केंद्र
आनंदबाजार पत्रिका लिमिटेड, कलकत्ता
फिल्म्स डिव्हिजन, मुंबई

नातवा बरोबर




पंचवीसेक वर्षांपूर्वींची गोष्ट. बावन्न सालच्या ऑक्टोबर महिन्यांत दिनेंद्र प्राध्यापक म्हणून उस्ताद अल्लाउद्दीनखाँ शांतिनिकेतनमधें आले होते. संगीतभवनाच्या नव्या होस्टेलमधें ते राह्यचे. बरोबर नातू – आशीषखाँ. तूप चोपल्यासारखा लखलखीत चेहरा, गुडघ्यापर्यंत येणारा कुडता, ढिला पायजमा अन् तोंडांत चिरूट. सदा हंसतमुख.

रोज संध्याकाळीं त्यांची मैफल बसायची. सरोद, व्हायलीन, तबला – नानाप्रकारचीं वाद्यं अगदीं सहजगत्या वाजवायचे. नातवाला तालीम द्यायचे. अन् शांतिनिकेतनमधले बरेचजण जमून मैफल रंगवायचे. अत्यंत आनंदी, प्रेमळ माणूस. वाद्य वाजवण्याबरोबरच नाना विषयांवर गप्पा चालायच्या. थट्टामस्करी अन् मधनंमधनं गाणं पण चालायचं.

खरं म्हंजे ही त्यांच्या गप्पांची मैफल होती. ह्या मैफलींत वाद्याबरोबरच खाँसाहेब आपल्या आयुष्यांतल्या नाना गोष्टी सांगायचे. कुठं काय वाजवलं, तें पण ऐकवायचे. सगळे मुग्ध होऊन ऐकायचे. असं दिवसामागनं दिवस चालत राह्यलं. तो एक भलताच आश्चर्यकारक अनुभव होता.

ह्या मैफलींत रोज कागद-पेन्सिल घेऊन भुल्लु बसायचा. १९६३ सालीं अकालीं मरण पावलेला शुभमय घोष. झरझर लिहून घ्यायचा सगळं. परत दुसऱ्या दिवशी खाँसाहेबांना वाचून दाखवायचा. ते म्हणायचे – हो की रे! अगदीं हुबेहूब आहे कीं!



मैफल पहिली

‘ देवी चौधुराणी ’ तुम्हांला माहीतच आहे. नाहीं का ? त्यांतला ‘ भवानी पाठक ’ ? [माझ्या पूर्वजांत पण एक भवानी पाठक होता. दीननाथ देवशर्मा. कुठल्यातरी लहान गांवांत ते राहायचे. देवशर्मा म्हणजे कोण ? ब्राह्मणच ना ? हो ! ते ब्राह्मणच होते. त्यांची बायको वारली न् मुलाला घेऊन त्यांनीं घर सोडलं. गेले निघून रानावनांत-डोंगरांत. कुकी लोकांच्या देशांत.

कुकी माहीत आहेत का नाहीं ? माणसाला खाणारे. हे तुमचे संताळ लोक खातात ना, तसेच. संताळ तरी आतां खूप सभ्य झालेयत. [पण कुकी अजुनी असभ्यच. आईबाप म्हातारे झाले कीं ते त्यांना खाऊन टाकतात. म्हणतात – आईबापांनीं आम्हांला पोटांत ठेवलं होतं, आतां आम्ही त्यांना पोटांत ठेवतों.]

तर अशा ह्या कुकी लोकांत दीननाथ जाऊन राह्यले. काली मंदिरांत कालीपूजा करायचे. कुकी लोकांना त्यांची फार भीति वाटायची. ते त्यांना भेटी आणून द्यायचे.

दीननाथांचा स्वभाव एखाद्या साधूसारखा होता. त्यांनीं मुलाला संस्कृत शिकवलं. बंगाली शिकवलं.

पण मुलानं बनवली पार्टी. कुकी लोकांना बरोबर घेऊन. म्हंजे जशी कॉंग्रेस पार्टी आहे का नाहीं, तशी.


ते इंग्रजांचा खजिना लुटायचे. अन् जितके म्हणून जुलमी जमीनदार होते ना – प्रजेचं रक्त शोषून घेणारे – त्यांचा पैसा लुटायचे न् गरिबांना वांटून टाकायचे.

मग जेव्हां क्लाइव्हसाहेबानं लढाई जिंकली, तेव्हां इंग्रजांनीं इनाम जाहीर केलं. – ह्या सगळ्या डाकूंना पकडून देणाऱ्याला लाखलाख रुपये देऊं !

तेव्हां ते मुसलमान झाले. त्यांनीं नांव बदललं. सिराजू डाकू. ह्या सिराजू डाकूचे वडील – दीननाथ – त्याला सोडून निघून गेले. एक दिवस सिराजू डाकूनं सिलेटच्या एका जमिनदाराकडे चिठ्ठी पाठवली. अमुक-अमुक तारखेला येतों. इतके-इतके पैसे तयार ठेवा. तर ठरल्या दिवशीं सिराजू डाकू गेला त्या जमिनदाराच्या घरीं. जाऊन पाह्यलं, तर सगळं रिकामं. बिलकुल रिकामं. आंत शिरून पाह्यलं, तर कुण्णी नाहीं. फक्त एका पलंगावर एक तान्ही मुलगी झोंपलेली ! सिराजू ह्या मुलीला घेऊन आला आपल्याबरोबर.

स्वतःच्या मुलाबरोबर तिलाहि ठेवलं घरांत. पाळलं. नंतर ह्याच मुलाशी तिचं लग्न लावून टाकलं.
सिराजूनं नवीन आयुष्य सुरू केलं. शिवपूरला (त्रिपुऱ्यांत) येऊन त्यानं घर केलं. जमीनजुमला केला.
सिराजू डाकूच्या मुलाला परत झालीं तीन मुलं – अलीअहमद, सालीअहमद न् जाफर महंमद. जाफरचा मुलगा मदारहुसेन. त्याचा मुलगा सदूखाँ. दीनचे वडील ते साधूसारखे होते. म्हणूनच साधूवरनं त्यांचं नांव सदूखाँ.
त्यांना परत पांच मुलं न् दोन मुली. समीरुद्दीन, आफताबुद्दीन, अल्लाउद्दीन, नायबुद्दीन, हयातअली. हा हयात तर होताच कीं शांतिनिकेतनमधें. माझी थोरली बहीण – सर्वांत थोरली – तिचं नांव मधुमालती. अन् माझ्या आईचं नांव – सुंदरी ! भारी गोड नांव !
शिवपूरचा शिव. त्याच्याचवरनं गांवाचं नांव. मोठं जागृत दैवत. सगळे नवस फळायचे. राजा कृष्णकिशोर चौधुरी – शंकरांना इथनं हलवून आपल्या गांवांत घेऊन जायला बघितलं त्यांनीं. पांचशे हत्तींनीं ओढलं ! पण पिंडी अजिबात हलली नाहीं ! दृष्टांत दिला रात्रीं स्वप्नांत येऊन – मला घेऊन जायचा प्रयत्न करूं नकोस. राजा कृष्णकिशोरनीं मग तिथंच देऊळ बांधलं. देवत्र संपत्ती दिली. हिंदु-मुसलमान कुणीही असो – मळ्यांतली पहिली भाजी, नव्या गाईचं दूध आणून आधीं शंकरांच्यापुढं ठेवणार.
ह्याच शंकरांच्या देवळांत लहानपणीं खेळायचों. सगळे म्हणायचे – शंकर भगवान् पण खेळायचे आमच्याबरोबर. पण ओळखूं आले नाहींत कधीं.
मोठमोठे साधू तिथं गांजा ओढायचे. गाणं गायचे. सतार वाजवायचे. लहानपणापासूनच मला साधुसंन्यासी फार आवडायचे. आई मला शाळेंत पाठवायची. बाकीच्या पोरांच्याबरोबर बगलेंत पुस्तकं मारून मी बाहेर पडायचों. सरळ शंकराच्या देवळांत जायचों. सतार ऐकायचों. अन् पोरांच्याबरोबर घरीं परत यायचों.
वडलांना संगीताची आवड होती. कासीमअलीखाँ माझ्या गुरूंचे मामा. वजीरखाँ न् त्यांचे हे मामा अगरतळ्याच्या दरबारांत होते. आमच्या घरापासून वीसबावीस मैलांवर. घरचे तांदूळ, तूप, मुर्गी – खासी भेट द्यायचे वडील खाँसाहेबांना. भारी चांगले तांदूळ

व्हायचे आमच्या घरीं.
सगळं ऐकून कासीमअलीखाँ एक दिवस म्हणाले – वीस मैलांवरनं चालत येतोस तूं ?
– हो खाँसाहेब ! तुमचं वाद्य ऐकून वेड्यासारखं व्हायला होतं !
– शिकतोस ? धंदा करणार नसशील तर ये, शिकवतों.
– वय झालं आतां ! येईल मला ?
– तुला सतार शिकवतों.
(श्रोत्यांमधल्या कुणींतरी विचारलं – तुमच्या वडलांचं काय वय होतं तेव्हां ?
तर खाँसाहेब म्हणाले – मी तेव्हां आईच्या पोटांत होतों. त्यामुळं विचारतां नाहीं आलं !)
वडील घरचं कांहीं बघायचे नाहींत. आईच सगळं बघायची. आई फार तापट होती. आई कांहीं म्हणाली तर बाबा म्हणायचे – तो पापाचा पैसा मला नकोय.
बाबा सतार वाजवायचे. मी तेव्हां दीड वर्षांचा असेन. बाबांची सतार ऐकायचों अन् आईच्या छातीवर तबला वाजवायचों.
ही यमनची गत ऐका. (खाँसाहेबांनीं वाजवून दाखवली.) बाबा वाजवायचे. ह्या ढंगाची गत आणखी कुठंच ऐकायला मिळाली नाहीं. गुरुजींना ऐकवली तशी गुरुजी एकदम चमकले. म्हणाले– अरे ! ही तर आमची गत ! मामाची गत ! तुला कुठं मिळाली ही ?



ही चीज जगांत कुठं मिळायची नाहीं.
(आणखी एक गत ऐकवली. हातवारे करत तब्येतींत येऊन हातानं कांहींतरी देत असल्याच्या पवित्र्यांत) वाढप ! वाढप करतेय ! म्हणतेय – आणखी जरा घ्या ना तुम्ही ! आणखी जरा घ्या ना तुम्ही !
अन् हा धीमा छायानट !
(आशीष जागेवरनं उठला. हंसून म्हणाले – कुठं पळतोस ! माझ्या बाबांची ही गत ऐक ! तुझ्या पणजोबांची !)
दादाला – म्हंजे आफताबुद्दीनला – शिकवण्याकरतां बाबांनीं दोन उस्ताद ठेवले होते. रामकानाई शील न् रामधन शील. रामकानाई तबला वाजवायचा, रामधन व्हायलीन वाजवायचा. आमच्या भागांत तेच तेव्हां मोठे उस्ताद होते. दादा वाजवायचा तें मी ऐकायचों अन् शाळेंत जातों असं सांगून साधूंच्या अड्डयावर जायचों.
एक दिवस हेडमास्तर घरीं आले. त्यांनीं तक्रार केली.
– तुझा मुलगा शाळेंत येत नाहीं तो !
आई म्हणाली – असं कसं ! मी तर रोजच पाठवतें कीं !
– मग आणखी कुठंतरी जात असेल. तूं तपास करून पहा.
हें ऐकून बाबांनीं जाऊन पाह्यलं तर एक साधू सतार वाजवतोय न् मीं ठेका धरलाय. दादाचं ऐकून जेवढंकेवढं यायला लागलं होतं न् काय !
बाबांनीं घरीं जाऊन सांगितलं – शंकराच्या देवळांत ठेका देतोय एका साधूच्या सतारीला. मारूंबिरूं नको त्याला.
आई म्हणाली – बाप तसा बेटा !
धरून आणून आईनं तीन दिवस हातपाय बांधून ठेवलं. खायला दिलं नाहीं. अन् खूप मारलं.
तीन दिवस गेले. माझी थोरली बहीण मधुमालती – तिच्याच हातीं मी लहानाचा मोठा झालों – ती आली न् मला घेऊन गेली आपल्या घरीं.
परत घरीं आलों होतों. आई आजारी होती. सावकाश आईच्या पदराची चावी काढून ट्रंक उघडून मुठींत मावले तेवढे दहाबारा रुपये मीं घेतले. आवाज होऊं दिला नाहीं अजिबात. परत सावकाश ट्रंक बंद करून कुलूप लावून चावी आईच्या पदराला

बांधून ठेवून पाय न वाजवतां बाहेर पळालों.
त्याच रात्रीं माणिकनगर स्टेशन गांठलं. डाकूच्या कुळांतला पोरगा ना मी !

नारायणगंजच्या वाटेनं शियालदह. चोहींकडं गाडीघोडे, दिवे, इमारती बघून घाबरून गेलों. गांवंढळ पोरगा मी. हातांत एक बोचकं न् आठ रुपये.
हॅरिसन रोडनं गंगेच्या पुलाकडं चाललों होतों. कलकत्त्यांत तेव्हां रस्त्याच्या मधोमध विटा घातलेल्या असायच्या. हें सगळं बघतबघत चाललों होतों. मधनंमधनं बसत होतों. मधनंमधनं थांबत होतों. अन् इमारतींच्याकडं बघत होतों.
पोरंटोरं शाळेला निघालेलीं. मला पाहून एकदां हा कान, एकदां तो कान ओढून पळून जायचीं. त्यांना वाटत असेल – हें कोण भूत आलंय !
नाहीं नाहीं. खरंच ! बघायचीं न् कान ओढून पळून जायचीं कलकत्त्याचीं पोरं !
असा मी गंगेच्या कांठीं येईपर्यंतच संध्याकाळ होऊन गेली.
सपाटून भूक लागली होती. गंगेच्या तीरावर तेव्हां उडिया लोकांनीं केलेली छान डाळपुरी मिळायची. फार चविष्ट खायला. ती दोन पैशांची घेतली न् खाल्ली.
आतां पाणी प्यायचं. पाण्याचा नळबीळ तर तेव्हां मला माहितच नव्हता. मग गेलों गंगेवर. तर खारट पाणी. वाटलं – अरेरे ! कसलं पाणी प्यावं लागतं ह्या देशाच्या लोकांना !
रात्रीं आंघोळीच्या घाटावर झोंपलों. बोचकं उशाला घेऊन.
सकाळीं उठून पाहतों तर बोचकं नाहीं ! वाईट वाटलं. रडायला लागलों
एक शिपाई होता. पोलीस. तो जवळ येऊन म्हणाला – क्या हुवा ?
– शिपाईसाहेब, माझं बोचकं चोरीला गेलं.
– अरे ! तूं तर बावळटच आहेस. असं कुणी बोचकं ठेवतं वाटतं ! किती पैसे होते ?
– आठ रुपये.
रडत-रडत निमतला घाटावर आलों. तिथं साधू बसले होते बरेचसे.

ह्या मोठाल्या जटा ! एक महात्मा बसला होता धुनी पेटवून. त्याच्या भोंवतीं बाकीचे साधू. खूप गांजा चालला होता.
तिथं गेल्यावर रडूं कोसळलं.
साधुबाबा म्हणाले – कुछ पर्वा नहीं ! गंगा नहाओ !
गंगेंत बुडी मारून आलों. साधुबाबांनीं भस्म दिलं तें खाल्लं. म्हणाले – सीधा जाव !
सीधा गेलों. एका अन्नछत्रांत कंगाल लोकांची जेवायची सोय. लुळे, पांगळे, आंधळे लोक चिक्कार जमलेले. त्यांना एक ब्राह्मण वाढपी भात-भाजी-डाळ देतोय.
मला तिथं थांबलेला बघून ब्राह्मण म्हणाला – काय बाळ ! जेवायचंय ?
खूप खाल्लं. जाडा भात, डाळ न् भाजी.
– जा, आतां पाणी पी !
– कुठं ? परत गंगेवर ?
– गंगेवर कशाला ? हा काय नळ आहे ?
तेव्हां नळाचं पाणी लक्षांत आलं.
समोरच केदारनाथ डॉक्टरांचा दवाखाना होता. चांगला ओटा होता. तिथंच झोंपलों.
रोज एकवेळ गंगाजळ प्यायचों. साधुबाबांनीं सांगितलं होतं. दुसऱ्या वेळेला लंगरखान्यांत. अन् ह्या केदारडॉक्टरांच्या दवाखान्याच्या ओट्यावर झोंपायचों.
एक दिवस केदारडॉक्टरनीं विचारलं – ए पोरा, कोण रे तूं ?
– मी घरून पळून आलोंय. घर आहे त्रिपुऱ्याला. गाणंबजावणं शिकायचंय.
– कसलं गाणंबजावणं ? उडाणटप्पू कुठला ! चोरीबिरी तर नाहीं ना करणार ?
– तुमच्या ओळखीचा कुणी उस्ताद असला तर गांठ घालून द्या ना !
– उस्ताद ! जोडा मारूं का ? चल हांकल !
– कृपा करून मला हांकलून देऊं नका. मला इथंच पडून राहूं दे. जातांना तुम्ही दाराला कुलूप लावून जा.
तिथंच रहात होतों.


लहानलहान पोरं औषध घ्यायला यायचीं. विचारायचीं – तूं कोण रे पोरा ? कुठनं आलायस ?
– त्रिपुऱ्याहून आलोंय. गाणंबजावणं शिकायचंय. कुण्या उस्तादाची गांठ घालून देतोस ?
कुणी ऐकायचं, कुणी नाहीं ऐकायचं. कुणीकुणी पैसा-दोन-पैसे देऊन जायचे.
एकवेळ गंगाजळ प्यायचों – साधुबाबांनीं सांगितलं होतं – अन् एकवेळ लंगरखाना !
असं चाललेलं असतांना एक मुलगा एक दिवस म्हणाला – मी एका उस्तादाकडं शिकतों. तुला पण घेऊन जाईन.
गेलों लुळ्या गोपाळजींच्याकडे. प्रख्यात धृपदिये होते. ख्यालपण गायचे. यतींद्रमोहनचे दरबारी गवई.
लुळे गोस्वामी म्हणाले – बारा वर्षं स्वरसाधना करावी लागेल.
– आयुष्यभर शिकीन.
जास्ती कांहीं बोलतां आलं नाहीं. आजूबाजूचं ऐश्वर्य, बिछायत, कापडचोपड बघून घाबरून गेलों.
सूर साधायचों – एका हातांत तंबोरा, दुसरा हात तबल्यावर. एका पायानं मात्रा मोजायच्या, दुसऱ्या पायानं ताल धरायचा. हा होता गुरुजींचा मूलमंत्र. शिष्यांना असंच शिकवतों. नातवाला पण असंच.
तीनशेसाठ प्रकारचे पल्टे गुरुजींनीं करून घेतले. त्याच्याबरोबर ताल. त्याच्यांत असा पक्का झालों की जें कांहीं ऐकायचों तें पकडायचों.
स्वरसाधना फार आवश्यक आहे. सरगम म्हणजेच तर अक्षरं. पण हें तर कुणीच करत नाहीं.
कांहीं दिवस शिकलों. मग ते वारले. प्लेगनं. निराश झालों – कारण आतां कांहीं शिकतां यायचं नाहीं.

विवेकानंदांचे भाऊ हाबू दत्त. ते सिमल्याला असायचे.
विवेकानंदांच्या घरांतले सगळेच उस्ताद. विवेकानंद धृपद चांगलं गायचे. हाबू दत्त क्लॅरिओनेट, सतार – बरींचशीं वाद्यं वाजवायचे. नॅशनल थिएटरचा कॉन्सर्ट बसवायचे.

– काय शिकणार ? गाणं शिकणार ?
– नाहीं. वाद्य शिकायचंय. व्हायलीन.
इंग्रजी बँड, सनई ऐकून खूप आवडायचं. लागलों शिकायला.
हाबू दत्तांनीं बसवलेल्या कॉन्सर्टचे सूर – यमन. एकेका दिवसांत चारपांच गती शिकायचों. महिन्याभरांत त्यांची वही संपवून टाकली. नंदबाबू लुद्दबाबूंना मृदंग-तबल्याची साथ करायचे. त्यांच्याकडनं तबला-मृदंग शिकलों.
हाबूबाबू म्हणाले – ठीक आहे. सगळीं वाद्यं शिकवतों.
नोकरी पण लावून दिली मिनर्व्हांतं. एक रुपया पगार. गिरीश घोष प्रोप्रायटर. शराब पिऊन मस्त होऊन यायचे. दानीबाबू, चुनीबाबू वगैरे सगळे होते. नृपेन बसू नाच शिकवायचे. काय-काय एकेक वाद्यं ! अन् गाणीं ! मर्जिनाचं गाणं – बाजे काजे मिन्सेके आर जेते देबो ना – (फालतू कामाकरतां त्याला कांहीं जाऊ देणार नाहीं) अन् – लेओ साकी भर दाओ प्याला – असलीं तर गाणीं. त्यांना वाटायचं, आपल्यासारखं गुणी कुणी नाहीं !
एक दिवस तबला वाजवत होतों.
गिरीश घोष म्हणाले – टकल्या चांगलं वाजवतोय कीं ! ए चुनी, निकल, देख ! ए टकल्या, तूं काय आमच्याकडं पण टकल्याच राहणारायस ?
मला भीती – शराब पिऊन काय करतील काय सांगतां येतं !
पाठीवर थाप मारून म्हणाले – तुझं नाव ठेवलं प्रसन्न विश्वास.

पगार मिळत असला तरी अन्नछत्रांतलं जेवण मीं टाकलं नव्हतं. लोबोसाहेबांच्याकडं जायचों व्हायलीन शिकायला. साहेब म्हणतो – निगरला शिकवायचं ? जा ! गेट औट !
मेमसाहेब चांगल्या होत्या. त्यांना सांगितल्यावर सगळं जमलं. इंग्रजी मात्रा, नोटेशन वगैरे शिकलों.
(जरा दम घेतों. थांबा. हुषारी येऊं दे.)
लोबोसाहेब होते खरं तर गोंव्याचे. ईडन गार्डनचे बँडमास्टर होते. त्यांच्या एका शिष्याकडनं कॉर्नेट पण शिकत होतो.
हाबू दत्त क्लोरिओनेट शिकवायचे. मच्छीबाजारांतल्या हजारी उस्तादाकडं सनई, नगारा न् चौघडा.

अडीच वर्षं शिकलों. फार गर्व झाला.
मुक्तागाछाच्या जगत्‌किशोर आचार्यांकडं खूप मोठाल्या उस्तादांची ये-जा असायची. कॉर्नेट, सनई, व्हायलीन घेऊन गेलों त्यांच्याकडं. पूजेचे दिवस. कॉर्नेट मी चांगलं वाजवायचों.
संध्याकाळीं राजेसाहेब तळ्याच्या कांठीं फिरत होते.
– काय पाह्यजे ?
– सात वर्षं सूर साधून इतकी विद्या शिकलों. बंगालमधेंच काय पण अख्ख्या भारतांत माझ्यासारखा उस्ताद कुणी नाहीं !
– लेकाचा वेडा आहे का काय ! कोणतं वाद्य वाजवतोस ?
– जगांतलीं सगळीं वाद्यं वाजवतों !
थिएटरमधल्या वाईट संगतीमुळं हें असं !
– सकाळीं आठला ये.
ते आठ म्हणाले, तर मी सातलाच गेलों. पाह्यलं, सुंदर दाढी असलेले एक गृहस्थ सरोदच्या तरफा मिळवत होते. राजेसाहेब लवाजम्यासकट बसले होते.
ते तोडीचे सूर बांधत होते अन् माझ्या अंगावर रोमांच उभे रहात होते. तारा लावून निषादापास्नं सापर्यंत एक तान त्यांनीं घेतली न् मी ओक्साबोक्शी रडायला लागलों.
सगळं संपल्यावर रडत-रडतच मीं त्यांचे पाय धरले.
– तुम्ही माझे गुरु ! तुमचं सैंपाकपाणी, घराची झाडलोट – सगळीं



कामं मी करीन! मला असं वाजवायला शिकवा !
– रो मत! – राजेसाहेब म्हणाले. – आत्तांच शागीर्द करून टाकतों तुला.
त्याच दिवशीं शागीर्द बनलों. तेव्हां माझं वय असेल सोळा-सतरा. उस्तादजींचं नांव होतं अहमदअली. रामपूरच्या अबीदअलींचा मुलगा. ह्यांचे पूर्वज बहादूरशहाकडं होते. अहमदअली चाकरी करायचे. घुघुडांग्याच्या दुलीचंद मारवाड्याकडं. गणपतराव, बादलखाँ, ताराबाई ह्यांच्यासारखीं गुणी माणसं तिथं यायचीं.
पहिल्यांदां अहमदअलींनीं मला चपात्या न् मटण पुलाव बनवायला शिकवलं. अहमदअलींना सैंपाक फार चांगला करतां यायचा. मी कांहीं मांस खायचों नाहीं. मधनंमधनं चपात्या न मांस कच्चं राह्यचं.
सरगम जी कांहीं वाजवायला दिली, सगळी एकाच वर्षांत पक्की होऊन गेली. अहमदअली जिथंजिथं वाजवायला जायचे, मी पण त्यांच्याबरोबर जायचों. तबल्याची, व्हायलीनची साथ करून २५-३० रुपये मिळायचे. त्यांना मिळालेले पैसे पण माझ्याच जवळ ठेवायचे. जरूर पडली कीं मागून घ्यायचे.
ते वाजवायचे तें सगळं मी ऐकायचों. सकाळीं चहा घेऊन अहमदअली जायचे कलकत्त्याला. मी सैंपाक करतांना तिथंच बसून ऐकलेलं वाजवायचों. चोरून. पुरीं चार वर्षं हेंच केलं.


एक दिवस तोडी वाजवत होतों. अहमदअली परतले न् तासभर बाहेरच ऐकत उभे राह्यले. मग त्यांनीं दार खडखडवलं.
– तुम चोर हो ! डाकू हो !
(डाकूंच्याच कुळांतला मी. आईचे पैसे चोरले. विद्या तर चोरणारच कीं !)
– चल नीघ !
म्हणालों – मी परत नाहीं असं करणार. पण तुम्ही सांगा, मी अगदींच वाईट वाजवत होतों ?
– हात तयार कर आधीं ! रियाज कर !
त्यांच्याबरोबर एकदा पाटणा-बनारसला गेलों होतों. दोन्ही जागीं चारपांच हजार रुपये जमले.

तर म्हणाले – चलो रामपूर !
गेलों. कच्चं घर. मातीच्या भिंती. मला ठेवलं लांब पायखान्याजवळ एका खोलींत. वासानं फार त्रास व्हायचा. अन् उस्ताद विचारपूस करायचे – अल्लाउद्दीन, चहा घे. कांहीं तकलीफ नाहीं ना ?
– नाहीं – पण वासामुळं –
एवढ्यांत एक दिवस उस्तादांच्या आईची गांठ पडली.
मग उस्तादांना म्हणालों – गुरुदेव, तुमचे जे पैसे माझ्याकडं ठेवायला देत होतांत, त्यांचा हिशेब घ्या.
– आहेत का काय शिल्लक ? आधींचे नोकर तर कधीं कांहीं परत द्यायचे नाहींत ! ते म्हणायचे, जेवाय-खायला सगळे खर्च होऊन गेले.
तर ते दिले. पेटीभर मोहरा.
माझे स्वतःचे पण दिले. गुरुदक्षिणा. शिवाय अन्नछत्रांतलं जेवण आतां बंद झालं होतं ना – त्यांच्याचकडं जेवायचों.
गुरुजींची आई म्हणाली – हा तर देवच आहे कीं ! दुसऱ्या कुणीं परत केले असते का ?
आईबाप दोघंही खूप खूष झाले. मग कुठं जरा बरी जागा मिळाली. कपडे स्वतः शिवून घालायचों. जाडी रोटी खायचों.
दहाएक दिवसांनंतर बघितलं तर गाडीभर विटा येतायत.
– अल्लाउद्दीन, विटा उतरवून घे.
कुठल्या कुक्षणीं ह्यांना दहा हजार रुपये परत केले कोण जाणे, तर आतां नवं घर तयार होतंय.
मग चुना, गवंडी, मिस्त्री – सगळं आलं.
– अल्लाउद्दीन, जरा हात लाव !
– हां गुरुजी ! जरूर !
म्हणून हात लावला. विटा वाहून-वाहून पोटशूळ झाला. तो अजून आहेच.
(तुम्ही बाबांनो, सगळे नीट वाद्यं शिका. गुरुजींनीं शाळा काढलीय. गुणी लोकांना आणलंय. मला तर कांहीं ती संधी मिळालीच नाहीं.)
अबीदअलींच्या आईनं एक दिवस बोलावून घेतलं मला. म्हणाली,
– हें बघ बाबा, एका डॉक्टरच्या हातनं बरं वाटलं नाहीं तर

माणूस दुसऱ्या डॉक्टरकडं जातो. माझ्या मुलाकडं जें कांहीं शिकलास तें शिकलास, आतां दुसऱ्या कुणाकडं तरी जा.
आपल्याला हांकलून देतायत वाटतं असं मला वाटलं. मी रडायला लागलों.
– कुठं जाऊं ? कुणाकडं जाऊं ?
– वजीरखाँसाहेब म्हणून आहेत. त्यांच्याकडं जा.
गेलों वजीरखाँच्याकडं. जायचों. पण भेटच व्हायची नाहीं. दरवान म्हणायचा – नहीं होगा ! कार्ड है ?
सहा महिने गेले असे.
नाटकांतले सहासात रुपयेच तेवढे अजुनी शिल्लक राह्यले होते.
आपल्यासारख्या गरीब माणसाला कसलं शिकायला मिळणाराय ?
पण मग बांगलादेशांत जाऊन तोंड तरी कसं दाखवणार ?
माणूसच झालों नाहीं ना !
तेव्हां ठरवून टाकलं – जीव द्यायचा. दोन तोळे अफू विकत घेतली. त्या दिवशीं पहांटें नमाज पढत होतों. मन उदास होऊन गेलं होतं.
एका मौलवीनं विचारलं – मन असं उदास कां तें ?
मशिदींत खोटं बोलणं म्हंजे महापाप. तर कबूल केलं कीं अफू आणलीय. जीव देणाराय. वाद्य कांहीं शिकतां आलं नाहीं. काय करायचाय जीव ठेवून ?
– अरे वाद्य शिकायला मिळेल तुला. दुसऱ्या उस्तादाकडं जा.
– कुण्णी शिकवत नाहीं.
– अरे तूं तर जाहिल आदमी आहेस ! हें बघ – हिंमते मर्दा, मदते खुदा ! – तूं प्रयत्न कर. प्रयत्न केला तर देवसुद्धां मिळतो.
मौलवींनीं एक अर्जी लिहून दिली.
– मी त्रिपुऱ्याचा राहणारा. सरोद शिकायला म्हणून मी इतक्या लांब आलों होतों. मी अफू खाऊन जीव देणार आहें.
वजीरखाँ कवी पण होते. त्यांचं नाटक होतं ‘ भर्तृहरी ’. नवाब चालले होते तें नाटक बघायला. मोटारींतनं. मी धांवत जाऊन दोन्ही हात पसरून रस्ता बंद करून उभा राह्यलों.
शिपाई-संत्री मला इकडंतिकडं ओढायला लागले. आपण कसे कर्तबगार आहोत तें दाखवायला बघतायत. हें माझ्या ध्यानांत

आलं होतं.
नबाब म्हणाले – हा काय प्रकार आहे ? काय पाह्यजे ?
मीं अर्जी पुढं केली. ती नबाबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींनीं वाचली. – आपल्या दरबारांतले वजीरखाँ. त्यांच्याकडे मला वाद्य शिकायचें आहे. तें होणार नसेल तर मी अफू खाऊन प्राणत्याग करीन.
ऐकून-बिइकून नबाब म्हणाले – कुठाय अफू ? बघूं !
अफूच्या दोन गोळ्या हातावर उडवत-उडवत नबाब म्हणाले – भलताच जाहिल आदमी आहेस कीं ! बरं चल. नाटक नाहीं का बघायचं ? चल माझ्याबरोबर.
हमीद मंझिल म्हंजे नबाबांचा राजवाडा.
नबाब म्हणाले – हं ! आण ! कुठलं वाद्य वाजवतोस ?
वाद्यं आणलीं. सरोद अन् व्हायलीन. रामपूरच्या दरबारांत सातशे गवय्ये-बजवय्ये. मोठमोठे तबलजी.
मीं जरासे आलाप वाजवले. तेच – चोरी केलेले.
नबाब म्हणाले – सरोद तर येतो तुला. आतां आणखी काय शिकायचंय ?
– वीणा !
– वीणा तर कांहीं हे लोक पोटच्या पोराखेरीज कुणाला शिकवत

गुरु वजीरखाँ



नाहींत. अर्थात् मी शिकतोंय.
– मग तुम्ही स्वतः शिकवा.
– माझ्या गाण्याला साथ करतां येईल का तुला ?
– हो !
मी तेव्हां व्हायलीन चांगलंच वाजवायचों. तर त्यांना साथ केली. नबाब खूष झाले. – नोकरी कर माझ्या दरबारांत.
– नाहीं. मी नोकरी नाहीं करणार. मला विद्या शिकायचीय. बिहागमधली होरी म्हटली होती नबाबांनीं. यमुनाजल सखि कैसे जाऊं. कसला वाजवतोंय मी ! गाणं ऐकून मुग्ध होऊन गेलों. – हुजूर ! आणखी एक म्हणा.
– क्या ? हुकूम कर रहा है ? अच्छा ! तू तर हरवलंस कीं मला बरोबर वाजवून ! आतां टप्पा वाजव बरं !
हें कांहीं जमलं नाहीं.
नबाब हंसून म्हणाले – हें ! मेला ! मेला !
—हुजूर ! मी तर मेलेलाच आहें ! हेंच शिकवा.
मग नबाबांच्या सांगण्यावरनं प्रायवेट सेक्रेटरी खाँसाहेबांना घेऊन आले.
नबाब वजीरखाँ म्हणाले – खाँसाहेब, ही बंगाली जात म्हंजे जंजाळाची जात आहे. हा बघा आलाय त्रिपुऱ्याहून. सहा महिने झाले, तुमच्या दारापास्नं परत येतोय. आज म्हणतोय, जीव देणाराय. तुम्ही शिकवा त्याला. कासीमअलींचे शिष्य आहेत ह्याचे वडील.
तावडतोब गंडा बांधायचा कार्यक्रम झाला. मोठाल्या थाळ्यांतनं मिठाई आली. सफेद पगडी आली. गुरुदेवांनीं पहिल्यांदां नबाबांना गंडा बांधला. (पहिल्या शिष्याला बांधावा लागतो. नवीन शिष्य करायच्या वेळेला.) मग मला बांधला.
शपथ घेतली – माझी विद्या कुपात्रीं देणार नाहीं. कुसंग करणार नाहीं. विद्या मोडून भीक मागणार नाहीं. बाईजी-वेश्येला गाणं शिकवणार नाहीं.
चोहींकडं पसरलं – एका बंगाल्यानं नबाबबहादुरांची गाडी अडवली म्हणून. मी बंगाली, बाँबबिंब फेंकतो का काय म्हणून पोलिसांनीं-डिटेक्टिवांनीं तपास केला.

म्हणून मग नबाबांनींच विचारलं—तूं बाँबबिंब तर टाकत नाहींस ना रे बाबा ?
– नाहीं हुजूर, पण तुम्हीं शिकवलंत तर सुरांचे बाँब मात्र टाकीन. तर राहूला लागलों गुरुजींच्याकडं. दिवसभर गुरुजींचे बूट, हुक्का, पानदान, मेडल्स साफ करत बसायचों. खूप खूष व्हायचे ते. दिवसां रियाज करायला वेळच मिळायचा नाहीं. रात्रीं चार वाजतां बसायचों रियाजाला. पहाटें उठायचों. सकाळचा नमाज पढून येऊन मडक्याला शेण मारून जरासा चहा व्हायचा. शिळी रोटी मीठ लावून खायचों.

एक दिवस चहाबिहा आटपून भैरवी वाजवतोंय. भैरवी भारी आवडते मला. पहातों तर समोर एक काबुली माणूस उभा. ही भलीथोरली दाढी.
– आंत आलों तर चालेल का ?
मी वाजवतच राहलों. एकदीड तासानंतर डोळे उघडले.
– बऱ्याच दिवसापास्नं फिरतोंय मी इथं. तुझं वाद्य ऐकतों. मला चहा देतोस का ?
चहा केला. तेव्हां त्यानं झोळींतनं एक काळी कटोरी काढली. चुलीवर धरून काय केलंन अन् कटोरी सोन्याची होऊन गेली.
– ही तूं मोडून आण न रोज मला चहा पाजत जा.
– पण त्याच्याकरतां सोनं कशाला पाहूजे ? चहा तर तुम्ही एरवींच रोज येऊन पीत जा कीं !
– छल ! जा बरं. मला हवंय तें.
रामपूरचा सुंदरलाल माझ्याकडं तबला शिकायचा. त्याच्याकडं गेलों आधीं. कारण पोलिसांनीं धरलं-बिरलं म्हंजे !
सुंदरलाल बघूनबिघून म्हणाला—अरे ! हें तर अस्सल सोनं आहे ! तुला कुठं मिळाली ही कटोरी ?
– एक महात्मा होता.
तीन तोळ्यांचे पैसे दिले त्यांना. रोज ते चहाची सामग्री आणायचे. सात दिवस चहा घ्यायचे. आठव्या दिवशीं एक रोटी. महिनाभर होते. जायच्या आधीं तमसा नदीत गळाभर पाण्यांत उभे राहूले सात दिवस. मग एक ताईत बनवून दिला त्यांनीं मला.

सव्वीस

तुमचा विश्वास बसतोय का ह्याच्यावर ?
म्हणाले – हा घे तुला. ठेवून दे. तुझं खूप भलं होईल. मी निघून गेल्यावर शनवारीं ऊद दाखवून हातांत बांध.
तसंच केलं.
झोंपेंतनं उठलों. बघतों तर राक्षसासारखे दिसणारे दोघंजण माझ्या डाव्या-उजव्या अंगाला झोंपलेयत !
सत्त्यानास ! हें काय ? स्वप्नबिप्न आहे का काय ?
ताईत काढून टाकला. बघतों तर राक्षस गायब ! काय प्रकार तरी काय आहे ? अल्लाउद्दीनचा चिराग का काय ?
दुसऱ्या दिवशीं पण तेंच. डोळे उघडले अन् घाबरून गेलों. हे मोठाल्ले केंस ! स्वतःच्या डोळ्यांनीं बघितलेयत ना !
तिसऱ्या दिवशीं ताईत फेंकून दिला तमसेच्या पाण्यांत.
गुरुदेवांना सांगितलं सगळं. ते म्हणाले – अरे ! हें काय केलंस तूं ? तुला दोन जामीन देऊन गेला होता तो ! तूं सांगशील तें केलं असतं त्यांनीं. महाबेवकूफ आदमी हो तुम ! मला तरी द्यायचास !

सत्तावीस

सरोद वाजवण्यासारखंच अल्लाउद्दीनखाँसाहेबांचं बोलणं पण सरस होतं. वाजवतायत, वाजवतायत – अन् मधेंच सरोद खालीं ठेवून कांहींतरी म्हणायचे. अन् लगेंच तें दिलखुलास हंसणं. ह्या मैफलींना हजर असणारे सगळेच हंसण्यांत सहभागी व्हायचे.
थट्टामस्करी करायचे – जास्तीकरून स्वतःचीच.
– मी बाबा दिवसां बंगाली न् रात्रीं पश्चिमी ! पश्चिमी कां ठाऊक आहे ? रात्रीच्या जेवणांत रोटी असते ना !
ह्याच्या आधीं शांतिनिकेतनला आले होते, त्या गोष्टी सांगायचे.
– गुरुजी होते तेव्हां. मी जायच्या वेळेला त्यांनीं एकदम नंदबाबूंना बोलावून घेऊन सांगितलं – ' नंदलाल, अल्लाउद्दीनचं डोकं ठेवून घे ! ' – नाहीं नाहीं. तसं घाबरण्याजोगं कांहीं नाहीं. नंदबाबूंचा एक शिष्य होता. नांव रामकिंकर. त्यानं माझं डोकं ठेवून घेतलं मूर्ती बनवून.



मैफल दुसरी

एकोणतीस

गुरुदेव रामपूर सोडून कधीं कुठंच जायचे नाहींत. काश्मीरचे महाराज एकदां आले होते. ही प्रचंड पगडी ! इतकी मोठ्ठी पगडी कोणत्याच राजाची मीं बघितलेली नाहीं. तर सरोद ऐकून महाराज म्हणाले – चला, जरा काश्मीर बघून याल.

तर गुरुजी म्हणाले – नंतर बघूं या.

गुरुजी मोठे मानी होते. दरबारांत अगदींच खास कुणी बडा पाहुणा आला असला तरच ते कांहीं ऐकवायला जायचे. एरवीं कधींच कांहीं ऐकवायचे नाहींत. त्यांचा पगारच होता सातशे रुपये. शिवाय हजार रुपये उत्पन्नाची जमीन. नबाबाच्या घरनं भांडीं भरभरून खायचे जिन्नस यायचे. छप्पन भांडीं. पुलाव, कबाब, बिर्याणी, कोफ्ता, पान-जर्दा. पाह्यलं कीं खावंसं वाटायचं. मधनंमधनं मिळायचं पण.

मटण खायच्या बाबतींत गुरुजी म्हंजे अगदीं यम होते. म्हणायचे – सकाळच्या वेळीं रोटीबरोबर मटण खावं न् ताणून द्यावी. गळा खुलतो. जन्माला आलासच कशाला ? मटण खायचं नाहीं तर !

–गुरुदेव, वाटतं काय खातोंय कुणास ठाऊक ! कुत्र्याचं मांसबिंस !

–अच्छा ? मी पकवीन. खाऊन बघ.

एक दिवस केले शामे कबाब. मी हातांत घेऊन वास घेऊन-घेऊन बघतोंय.

गुरुजी दरडावले – ए ! हुंगतोस काय ? खा कीं बेट्या ! मछली का पानी !

भीत-भीत मीं खाल्ला. एक खाल्ला. खूप आवडला.

म्हणालों – हुजूर, आणखी एक द्या.

असे आठदहा मटकावले कीं !

चुपशा मियांच्या कबरीजवळच्या एका घरांत मी राह्यचों. एक गेट होतं. दुसऱ्या साइडला गुरुजींचं घर. आणखी दुसऱ्या साइडला दरगा.

नबाबांनीं सांगून ठेवलं होतं – रोज गुरुदेवांची सेवा करत जा. पैशाअडक्यानं कांहीं ही विद्या मिळत नाहीं. माहित आहे ना ? सकाळीं गेलों. गुरुदेव आठाच्या सुमारास उठायचे. पायखान्यांत

पाणी टाकलं. फिनाइलनं धुऊन काढला.
रोज हें करायचों अन् वाद्य घेऊन उभा राह्यचों.
अशीं अडीच वर्षं गेलीं. एक तासभरदेखील कुणाच्यानं सहन झालं नसतं.

रामपूरला एक बँड पार्टी होती. ऑर्केस्ट्रा. सातशे जणांचा ऑर्केस्ट्रा. महमदहुसेनखाँ – आपल्या मुश्ताक हुसेनखाँचे गुरुभाई अन् इनायतखाँचे भाऊ – ते ह्या ऑर्केस्ट्रांत होते. त्यांच्याकडे जायचों मी.
तर ते एक दिवस म्हणाले – मंत्र घे तूं. माझ्या गुरूकडनं.
त्यांच्याबरोबर बरेलीला गेलों साधूकडं.
हात हातांत घेऊन गुरु म्हणाले – अरे महंमदहुसेन, ह्याचं मन तर संगीताकडं आहे. तीच त्याची आध्यात्मिक साधना. इकडं नाहीं रे ह्याचं मन. ह्याला कशाला आणलंस माझ्याकडं ?
महंमदहुसेनचा शागीर्द झालों. ते होते बीनकार. बारा वाजतां गुरूकडनं त्यांच्याकडं जायचों.
खायला पैसा नाहीं. हरभरे खायचों न् पाणी प्यायचों. पोट भरून जायचं. अजुनी खातों हरभरे. भारी चांगली गोष्ट आहे ही. अन् वाटाणे.
आणखी एक बँडमास्तर होते. राजा हुसेनखाँ. लखनौच्या दौलतखाँचा मुलगा. ते धृपद-होरी गायचे. माझं वाजवणं ऐकून त्यांनीं माझी खूप तारीफ केली. तिथं मुस्तफा हुसेनचे सासरे निसार हुसेनचे आजोबा हैदर हुसेनखाँ अन् फायदा हुसेनखाँ होते.
व्हायलीन ऐकून ते म्हणाले – अरे, तूं इकडं निघून ये.
राजा हुसेनखाँ धृपद-होरी गायचे. बँडची त्यांना माहिती नव्हती. हाबू दत्तचा बँड मला माहित होता. राजा हुसेन बँडच्या गती तयार करायचे. त्या मोडून तोडून मी ट्यून नीट करून द्यायचों.
राजा हुसेन म्हणाले – बाबा, तुला मी खूप धृपदं देतों. तूं बँड काढ.
तेव्हां पण माझे गुरुदेव मला कांहींच शिकवत नव्हते.
दरबारांत कांहीं गवई असायचे. त्यांना म्हणायचे नक्काल. मोठमोठे गवई गाऊन गेले रे गेले कीं नबाबाच्या हुकमावरनं हे लगोलग

हुबेहूब तसंच गाऊन दाखवायचे. राजा म्हणायचा – नकल करो ! लगेच हिरालाल नक्काल अगदीं फैयाजखाँसारखं गाऊन दाखवायचा. भयंकर हंसूं यायचं. त्यांची नोकरीच होती ती. दाढीवाला बहादूर, अली अफातुल – हे सगळे नक्काल होते. ह्यांच्याकडनं पण खूप मिळालंय मला.

आतां माझी एक शरमेची गोष्ट सांगतों. – नाहीं, आयाबहिणी आहेत, नातवंडं आहेत. कांहीं वाटून घेऊं नका.
आमचं घर खेडेगांवांत. घरंदाज माणसं. घरांत तीन सुना. त्या जेव्हां बाहेर पडायच्या तेव्हां दोन बदमाश माणसं त्यांच्यामागं लागायचीं. थोरल्या वहिनी खूप हिमतीच्या. त्या बोलल्या एक दिवस त्याला – आम्ही घरंदाज बायका. आमच्या मागं लागतोस ! शरम नाहीं वाटत तुला ?
दादाच्या पण कानावर घातलं त्यांनीं हें. पंचायत बसली. हिंदू, मुसलमान दोघांनीं मिळून त्या माणसाला दंड केला.
त्याच दिवशीं माझ्या बायकोनं गळफांस लावून घ्यायचा प्रयत्न केला. तिला वाटलं – आपल्यावर वाईट नजर पडलीय. धरून पण नेतील एखादेवेळीं. कलंक लागेल.
असा तीनदां प्रयत्न केला होता तिनं गळफांस लावून घ्यायचा. हें कांहीं निव्वळ माझ्याच बायकोचं म्हणून नाहीं. ही भावना



सगळ्याच बंगललनांची आहे. हें सतीत्व.
माझ्या गुरूकडं तार आली.
बेअदबीची गोष्ट सांगितली म्हणून मनाला लावून घेऊं नका.
तार मिळाल्यावर गुरुजी तर चाटच पडले.
– अरे अरे, बाबू कुठाय ? प्यारेमियाँ, मझलेसाहब, छोटेसाहब !
बाबू कुठाय ?
बंगाली माणसाला ते लोक बाबूच म्हणायचे.
गुरुजींचां मुलं म्हणालीं – तो तर रोज बारा वाजेपर्यंत इथं उभा असतो हुजूर !
– तुम्ही शिकवलं नाहींत का कांहींच त्याला ?
– तुमची आज्ञा नाहीं ! कसं शिकवणार ?
– बोलव ! बोलव त्याला !
हांक ऐकून आलों लगोलग.
म्हणाले – मी कोण आहें ?
– मालिक !
– अरे, उस्ताद म्हण. कोण कोण आहे तुला आणखी ?
– आई-वडील-भाऊ-बहिणी !
– लग्न केलंयस ?
मीं मान खालीं घातली.
–कां म्हणून केलंस लग्न ?
– आईबाबांनींच करून दिलं.
– कधीं ?
– लक्षांत नाहीं कधीं तें. मी सातेक वर्षाचा होतों तेव्हां.
हें ऐकून गुरुजींना हंसतां पण येईना.
– इतक्या लहान वयांत लग्नं होतात तुमच्यांत ?
– बाबांची न् सासऱ्यांची मैत्री होती त्यामुळं –
एवढं बोलणं झाल्यावर मग मुलांना बोलवून घेतलं. (नसीरखाँ, नजीरखाँ, सगीरखाँ. ह्या नसीरखाँचा मुलगा म्हंजे डबीरखाँ.)
त्यांना म्हणाले – प्यारेमिया, मझलेसाहब, छोटेसाहब – आजपास्नं हा अल्लाउदीन तुमचा भाऊ झाला. तुम्हांला जी तालीम दिलीय ती सगळी तुम्ही ह्याला द्या. मी पण शिकवतों.
अशी झाली सुरवात माझ्या शिक्षणाची – माझ्या बायकोनं

गळफांस लावून घेतल्याची बातमी कळल्यामुळं !

आमचे बँडमास्टर पण गुरुजींचे शिष्यच. ते येऊन म्हणाले – हुजूर, माझी एक प्रार्थना आहे. ह्या बाबूला माझ्याकडं द्या. आमच्या बँडमधें वाजवूं दे त्याला. खूप मदत होते त्याची.
ऐकलं त्यांचं. दिलं मला.
बँड पार्टींत एक तासभर व्हायलीन वाजवायचों. बारा रुपये मिळायचे. त्यावेळचे बारा रुपये. मग हरभरे खाणं बंद झालं. गुरुजींच्याचकडं जेवायचों.
माझी गुरुमाता ! त्या पण सतार फार चांगली वाजवायच्या. मागनं गुरुजी म्हणायचे – तुझी आई वाजवतेय ! बाई ग, तुझी गत ह्याला शिकवून टाक बरं !
गुरुमाता मोहरममधें मर्सिया गायच्या. रडूं आणायच्या.
गुरुजी वाजवायचे रात्रभर. बारानंतर. मग झोंप. आठपर्यंत. काय वाजवायचे ! वाटायचं – भगवान आ गया !
गुरुजी धृपद गायचे चांगलं. भारी देखणे होते. सांवळा रंग. फोटो आहे माझ्याकडं. ४०-५० वर्षांपूर्वीचा. वारले तेव्हां ६५ वर्षांचे होते.
तीस वर्षं शिकल्यानंतर गुरुजींनीं आदेश दिला – देशभर फिर. शिक्षा (शिक्षण), दीक्षा न् परीक्षा – ह्या तीन गोष्टी म्हंजेच विद्या. गुणी लोकांच्याकडनं ऐक अन् त्यांना ऐकव.

तर निघालों. फिरत-फिरत आलों कलकत्त्याला. गणपतरावंचे शिष्य श्यामलाल खत्री होते तिथं. भवानीपूरच्या एका संगीत संमेलनाचं आमंत्रण मिळालं.
मी उतरलों होतों पुटियाच्या राणीच्या वाड्यांत. तो नाहीं का हेदुआच्या बाजूला ? बीनकार लछमीप्रसाद, करामतुल्ला – नाहीं नाहीं, खोटं नाहीं – इमदाद वगैरे होते. अन् विश्वनाथराव, धमारगायक दानीबाबू, राधिका गोसावी.
मला मृदंगाची साथ करणार होते दर्शनसिंग. त्यांच्या ड्रेसचा काय भपका होता ! कशीदा काढलेला झब्बा ! माझं पण तसंच. तेव्हां फौजी कोट बघितला होता नवीन. खूप आवडला. म्हणून तो

घालायचों. तर तो कोट चढवला. दाढी होतीच. रामपुरी पायजमा. धोतर कुठलं – गरीब माणूस !
गेलों संमेलनांत. पण कुणी मला बोलवेचना. ह्याच्याकडं जातोंय, त्याच्याकडं जातोंय. पण पत्ताच लागूं देत नाहींत अजिबात.
माझ्या कार्यक्रमाची वेळ झाली. कालीबाबूंना हांक घातली. तर ते आपले पान चघळत खेळण्यांत गुंग. आले सरतेशेवटीं.
मणीन्द्र नंदी आले – इतका उशीर ? सगळे गप्प. कां, उशीर कां ?
कालीबाबू म्हणाले – अल्लाउद्दीनची कांहीं चूक नाहीं. उशीर माझ्यामुळं झाला. खाँसाहेब पहांटेपास्नंच तयार आहेत.
पहिल्यांदां कुणी धड बघेचना माझ्याकडं. थाट हा असा ! वाटलं, कुठला जंगली आलाय कुणास ठाऊक ! मग तंबोरा लावून जेव्हां एक तान घेतली, तशीं सगळे म्हणाले – अरे माणूस गुणी आहे बरं का !
सगळेच ऐकायला लागले. जवळजवळ अर्धा तास विलंबित आलाप. तेव्हां गुरुदेवांची आठवण डोळ्यांत फिरत होती. कुणाच्या दांतांत पान. कुणाच्या हातांत सिग्रेट – तशीच. तोंडांत घालणं कांहीं होईना. काडी ओढून सिग्रेट पेटवायची – तर काडी विझून गेली अन् सिग्रेट पेटवणं तसंच राह्यलं.
दर्शनसिंग आला होता तबल्याकरतां. तर कालीबाबू म्हणाले – हा बाबा तबलजींचा यम आहे ! आणखी कांहीं तबलजींना बसवून टाका.
दर्शनसिंगचा दम अर्ध्या तासांतच निघाला. दुसरा तबलजी आला. चार तास वाजवत गेला. लछमीप्रसाद बीनकार ऐकून म्हणाले – ही तर बीनकाराची तालीम आहे ! अल्लाउद्दीन, तूं शतायुषी हो. अन् ह्या देशांत विद्येचा प्रसार कर.
– तें शक्य नाहीं. मी शिकतोंय. माझी साधना अजून शिल्लक आहे. गुरुदेवांचा आदेश देशांत फिरायचाच तेवढा आहे. शिकवायचा आदेश नाहीं.
श्यामलाल खत्री पिच्छा सोडेना. म्हणाला – मैहर एक लहानसं संस्थान आहे. पण राजाला भारी हौस आहे गाणं-बजावणं शिकायची. तूं जा. आत्तांच पुढं पूजा येतेय. त्याचवेळीं जा. हा राजा मित्र आहे माझा.

कबूल झालों.
इकडं श्यामलालनं राजाला तार सोडली – ह्याला सोडूं नकोस.

आलों मैहरला.
गेस्ट हाऊसमधे उतरवलं. खूप आदरातिथ्य केलं.
सप्तमीच्या दिवशीं राजाकडनं बोलावणं आलं. नकीबानं येऊन सांगितलं – याद फरमाता – राजा बहादर का दरबार याद किया है। चाळीस-पन्नास जण सरदार तलवारी घेऊन तिथं होते. वाद्य लावत होतों. तंबोरा धरायला पण कुणी नाहीं. मथुरेचे घुरेंमहाराज होते. ते चंदन चौबेंचे शिष्य. तर त्यांनीं तंबोरा धरला. म्हणाले – सूर मी देतों.

महाराज आले. सगळे उठून उभे राहिले. नकीब नजर-दौलत वगैरे बरंच कांहींतरी म्हणाला. मीं उठून पांच रुपये नजर केले. आठ आण्याची मोहर दिली.
महाराज म्हणाले – आप अच्छा है ? आपको तकलीफ नहीं हुआ ?'
– नहीं सरकार !
– माझं संस्थान छोटंसं आहे. मला गाण्याची फार हौस आहे. आत्तां एका वर्षामागंच तर मी गादीवर आलोंय. तुम्ही माझे गुरु व्हा.
मी गप्पच राह्यलों. मी तर शिष्य. मी कसा काय गुरु होणार ! राजाचा असा पण कीं ज्याला सगळीं वाद्यं वाजवतां येत असतील न् गाणं येत असेल, त्यालाच गुरु करायचं.
तें जाऊं दे. तर राजानं कांहींतरी वाजवायला सांगितलं. मीं श्री राग सुरू केला. तेव्हा संध्याकाळचे पांच वाजले होते. मीं नुसती सुरवात केली न् पाह्यलं तर राजा आपला एकदां इकडं बघतोय, एकदा तिकडं बघतोय. शेवटीं पांच मिनिटं झाल्यावर राजा म्हणाला – आराम कीजिये।
आतां आराम काय करूं रे बाबा ? झोंपून जाऊं का काय ?
परतलों. वाटायला लागलं. हें काय मूर्खाकडं आलों आपण ! मन तर खराब होऊन गेलंच.

परत आठ वाजतां हांक आली. – अगदीं तावडतोब या.
जाऊन पाहतों तर एक भलीथोरली खोली. वाद्यांनीं भरलेली. नाना प्रकारचीं वाद्यं. बांसरी, सनई, एस्राज, सतार, सरोद, व्हायलीन, मृदंग, तबला. आणखी पण कायकाय एकेक !
महाराज नाहींत. घुर्रेमहाराज होते. तेच म्हणाले – तुम्ही प्रत्येक वाद्य थोडंथोडं वाजवा. ज्याला सगळीं वाद्यं वाजवतां येत असतील त्यालाच गुरु करायचं असा पण आहे राजाचा.
राजा लांब होता. तो टेलिफोनवरनं सगळं ऐकणार होता. त्याला जें कांहीं सांगायचं असेल तें टेलिफोनवरनंच सांगणार होता.
मी वाजवायला लागलों. काय वाजवणार ? आधींच्या त्या प्रकारानं मन खराब झालेलं. तर सुरूं केलं – लेओ प्याला भर साकिया ! तें नाटकांतलं गाणं ! नंतर – शी ! शी ! शी ! इतकं जंजाळ ! जरासं वाजवलं कीं म्हणायचा – बंद करो !
ब्लड हॉर्न आणून दिलं. वाजवलं. पों पों पों भों – अन् लगेंच बंद करो ! श्वासमधें एक फुंकर मारली. राजा म्हणाला – बंद करो !
कांहींहि वाजवलं – सागपसा सागरेसा – लालाला ढुक लाला – तरी राजा म्हणायचा – बंद करो !
पन्नास प्रकारचीं वाद्यं वाजवलीं.
डमरू भी बजाइये !
वाजवायला लागल्यालागल्या म्हणतो – बंद करो !
– ढोल बजाओ !
चिक्का धित्ता !
– बंद करो !
चामड्याचीं वाद्यं संपल्यावर एस्राज आला.
अ-आ-आ अशी तान घ्यायला लागल्याबरोबर म्हणाला – बंद करो !
दोन तास निघून गेले. परीक्षाच झाली माझी. मोठी जबर परीक्षा. मग आलं व्हायलीन. सतार-बितार पण बरी होती. पण राजा म्हणाला – तें झालं सगळं. माझा पण पुरा झाला. एक गाणं ऐकवा.
गाणं झालं.
म्हणाला – व्हायलीन ?
व्हायलीन ऐकवलं.

तेव्हां म्हणाला – इकडं माझ्याकडं या.
सगळं टेलिफोनवर चाललेलं बोलणं. मला वाटत होतं, आतां आणखी कसली परीक्षा घेतोय कोण जाणे. संधिप्रकाश श्री राग म्हंजे मला एवढी अभिमानाची गोष्ट – आनंददायक गोष्ट. पण श्री रागच दोन मिनिटं ऐकून बंद करून टाकला. तर अशा प्राण्याकडं काय जायचं !
तरी गेलों. तासभर मन लावून ऐकलं त्यानं. मग म्हणाला – तुम्ही रागावला तर नाहींत ना ?
– छे छे महाराज ! असं काय बोलतां ? मी तुमच्यावर रागावणं शक्य तरी आहे का ?
– मगाशीं काय वाजवत होतांत ?
– संधिप्रकाश श्री राग. सकाळीं न् संध्याकाळीं वाजवतात. सूर्यास्ताच्या न् सूर्योदयाच्या वेळचा राग आहे तो.
– असे पण राग असतात का काय ?
– हो महाराज. प्रत्येक वेळेच्या रागरागिण्या आहेत.
– तुम्ही हा राग वाजवत होतांत तेव्हां माझ्या अंगावर रोमांच उभे रहात होते. मला सहन करवेना. म्हणून बंद करायला सांगितलं. उद्यां दरबार भरेल. तुमची जागा सरदार न् मंत्र्यांच्या नंतरची. तिसरी जागा.
परतायच्या वेळेला मला जरीची पगडी दिली.

दुसऱ्या दिवशी गेलों. मी जंगली माणूस. पगडी बांधायचं कांहीं माहित नव्हतं. घुर्रेमहाराजांनीं पगडी बांधून दिली.
त्या दिवशीं दरबारांत राज्यांतली सगळी प्रजा आली होती. छोटंसंच राज्य. राजा सगळ्यांना म्हणाला – आज दसरा आहे. माझी फार दिवसांपास्नंची इच्छा आहे – गाणं शिकावं, उस्ताद ठेवावा. ज्याची अपेक्षा होती, त्याच्यापेक्षां जास्तीच मला मिळालंय. तुम्ही पण सर्वांनी ह्यांचा गुरु म्हणून स्वीकार करा. सगळ्या प्रजेनं हात वर करून मान्यता दिली.
पण मी अजुनी शिष्यच होतों ना ! गुरूचा आदेश होता निव्वळ देशभर फिरायचा. म्हणून मी राजाला म्हणालों – मला तुम्हांला गंडा बांधतां येणार नाहीं.

राजा म्हणाला – मीं तुम्हांलाच गुरु म्हणून मानलेलं आहे. आतां तुम्हांला जातां यायचं नाहीं. मी मात्र तुम्हांला गुरुजी न म्हणतां दादाच म्हणीन.
– पण गुरुजींनीं निव्वळ देशभर फिरायचाच तेवढा आदेश दिलाय.
– ठीक आहे. दिवाणजी, तुम्ही आत्तांच्या आत्तां रामपूरला जा.
दिवाणजी गेले. गुरुदेवांना कळल्यावर ते खूपच खूष झाले. स्वतःच्या हातानं त्यांनीं गंडा तयार केला. सरस्वतीमाईचा प्रसाद पाठवला. मी नोकरीला लागलों.

मला स्वतःला शिकायला खूप त्रास पडला होता. म्हणून मीं पण केला होता कीं विद्यादान करून कुणाची एक कवडी घेणार नाहीं. पैसा घेणार नाहीं. म्हणून मी राजाला म्हणालों – तुम्ही माझे शिष्य आहांत. तुमच्याकडनं मला कांहीं घेतां यायचं नाहीं.
– म्हंजे काय ? मग खाणार काय ?
राजाच्या राज्यांत देवाची जमीन होती. देवत्र. तिचं मॅनेजर केलं मला. दीडशे रुपये पगार. आत्तांचे हजार रुपये म्हंजेसुद्धां त्याच्यासमोर कांहींच नाहींत. शिवाय राह्यला चांगलं घर.
नंतर उदयशंकर जेव्हां युरोपांत गेला. तेव्हां मला पण घेऊन गेला. युरोपांतनं परतल्यावर मीं स्वतःचं घर बांधलं. आतां बरींच वर्षं आहें. मैहारमधें.

पहिल्यांदां राजा जेव्हां शिष्य झाला, तेव्हां एक दिवस मला म्हणाला
– माझ्या तर कांहीं वाद्य शिकायचं मनांत नाहीं. मला गाणं येईल का ?
– तुमचा आवाज ऐकूं दे. गळा कसा काय आहे बघूं या.
आतां परीक्षा राजाची होती.
आवाज ऐकला. तर अगदीं रेड्याचा आवाज.
राजाला म्हणालों – महाराज, संगीतसाधना करणाऱ्याला बऱ्याच गोष्टींची जरूर असते. आतां मी सांगीन तें तुम्ही ऐकाल का ?
– ऐकीन.
– मग दारू सोडा.

– तथास्तु !
– राणीशिवाय कुणाकडं वाकड्या नजरेनं बघतां येणार नाहीं !
– तथास्तु !
– ब्रह्मचर्य पाळावं लागेल.
– हें मात्र कांहीं जमायचं नाहीं उस्तादजी. पण जमेल तितकं पाळीन.
– मीं सांगेन तशी साधना करावी लागेल.
– हो करीन.
दीड वर्ष स्वरसाधना करून घेतली. राजानं मांस सोडलं. शाकाहार सुरू केला. तो अजून चालूं आहे. असं दीड वर्ष झाल्यावर रेड्यासारखा आवाज तारेसारखा होऊन गेला. राण्यांना पण शिकवायचों. त्या बायका असल्या तरी आईसारख्या. त्यामुळं शिकवायला कांहींच हरकत नाहीं.
राजाच्या आदेशाप्रमाणं एक बँड पार्टी पण केली. सगळ्या अनाथ मुलांना तिच्यांत घेतलं. दवंडी पिटून शेदीडशे मुलं गोळा केलीं. तीं माझ्याच घरीं राह्यचीं. खायचीं-प्यायचीं. माझी बायको अजून इकडं आली नव्हती. तर मला दिवसभर काम असायचं. राजाला आठ तास शिकवायचों. चार तास बँड पार्टीचं काम. तिमिरवरण होता, त्याला दोन-तीन तास शिकवायचों. राजा म्हणायचा – मी कुठंहि बाहेर पडलों कीं मला गाणं ऐकू येऊं दे. कुठंच कांहीं



बेसूर राह्यला नको.
हेंच करत होतों न् रियाज कांहीं होईचना. तळमळून टाकणारी तहान लागली. संगीताची भूक म्हंजे महाभयंकर भूक आहे. कांहीं बरं वाटेना.
राजाला म्हणालों – मला रियाज करायला होत नाहीं. बरं वाटत नाहीं. वेड्यासारखं होतं.
राजा म्हणाला – तुम्ही इथंच जेवणखाण करत जा. म्हंजे वेळ मिळेल.
– तें जमायचं नाहीं.
– तुम्हीं लग्न केलंच नाहींत का हो ?
– हो ! केलंय. कधीं तें पण लक्षांत नाहीं.
– तर मग गुरुमातेला घेऊन या.
निरोप पाठवला. माझा दादा – आफताब – आपल्या भावजयीला घेऊन आला.

नोकरी करायला लागून एक वर्ष होऊन गेलं. एक दिवस बाजारांत गेलों होतों. एवढ्यात काळा लिफाफा आला. गुरुजींचा थोरला मुलगा वारला होता.
बाजारांतनंच परस्पर रामपूरला निघून गेलों. गुरुजींची अवस्था

बायको – मदनमंजरी



मोठी व्याकुळ झाली होती. मी गेल्या-गेल्या म्हणाले – कोण ? अल्लाउद्दीन ? ये ये. तुला खूप त्रास दिलाय मीं. त्याचं पाप लागलंय मला. थोरल्या मुलाला सगळं शिकवून तयार केलं होतं. त्यानं सगळं शिकवलं असतं. तो वारला. शिष्याचं शिक्षण, मुलाचं शिक्षण न् मुलीच्या घरचं शिक्षण. थोरल्या मुलाला शिकवलेलं सगळं तुला देतों. वीणा शीक. तीन वर्षांत सगळं शिकवतों.
राह्यलों तिथंच. नेसत्या कपड्यांनिशी आलों होतों. राजाकडं तार गेली.
गुरुजी म्हणाले – चाळीस दिवस झाल्यावर मग शिकवतों.
मुलाच्या घरचं सगळं शिकवलं. 'हमार भगवान' हा धमार तेव्हां शिकलों. धृपद पण शिकलों त्यांच्याकडनं. वीणा शिकवायची गोष्ट काढल्यावर मी म्हणालों – वीणा ! मी मरून जाईन गुरुजी !
– मग रबाब शीक. सूरशृंगार शीक.
तें शिकलों. शिकवतां-शिकवतां गुरुजी सारखंसारखं म्हणायचे – सगळं शिकून घे. नाहींतरी आणखी कुणाला द्यायचंय आतां हें ? नातवंडं अजून लहान आहेत सगळीं. आतां तुझ्याचकडनं शिकतील तीं. तुला फार त्रास दिला होता मीं. आतां तुझा सगळा

मुलगी – अन्नपूर्णा



त्रास संपून जाईल.
मग गुरुजी वारले.

मला तीन मुली. एक मुलगा – अलीअकबर. मुलींचीं नांवं सरोजिनी, अन्नपूर्णा, जहानारा. जहानारा वारली. हा मुलगा मला गुरूंच्या कृपेनं मिळाला. मुलगा होत नाहीं असं गुरूंच्या लक्षात आल्यावर त्यांनीं एक भस्म दिलं. ते वजीरखाँ नाहींत – दुसरे एक गुरु होते. म्हणाले – बायकोला खायला दे. तें दिल्यावर अलीअकबर मिळाला. मला आणखी एक मुलगा हवा होता. तो कांहीं देवानं दिला नाही. नाहीं नाहीं. तो पण दिला – रविशंकर. आमच्या अन्नपूर्णेशीं लग्न केलं त्यानं.
हा माझा नातू – अलीअकबरचा मुलगा. नांव ठेवलंय महंमदआशीष. मुसलमान म्हटलं तर महंमद. हिंदू म्हटलं तर आशीष.


सरोद मी डाव्या हातानं वाजवतों. रामपूरला चार वर्षं उजव्या हातानंच शिकलोंय. रामपूरच्या दरबारांत बरेचजण माझी खूप

मुलगा – अलीअकबर



टिंगल करायचे – बंगाली धोतीवाज, मच्छीका पानी पीनेवाला ! – असं रोज चालायचं.
दोनेक महिने मीं मुकाट्यानं ऐकून घेतलं. मी व्हायलीन चांगलं वाजवायचों – ते जळायचे. अन् टिंगल करायचे – मच्छीका पानी पीनेवाला ! असलं खाऊन कांहीं गाणंबजावणं होत नाहीं.
बँडमास्टर म्हणायचे – नाहीं नाहीं, असं म्हणूं नका तुम्ही. बंगाली माणसाच्या डोक्याला तोडच नाहीं. अल्लाउद्दीनला नोटेशन कसं अचूक येतं ! कुणी गाऊं दे तर, एका मिनटांत ऐकवेल.
ह्यावर ते म्हणायचे – क्या नोटेशनमें गाना होता है ? मच्छीका पानी पिया है ?
मग मला नाहीं सहन झालं. म्हणालों – आपके बापको पिया है ! तरी ते माझा पिच्छा कांहीं सोडेनात.
– मासे खातोस ?
– मासे तर मिळतच नाहींत. मी आपला हरभरे खाऊन राहतों. पैसे कुठायत ?


मैहरची शारदा देवी



— मग नोकरी कर. हें असलं खाऊन काय सरोद वाजवता येतो, का गाणं गाता येतं ?
— मग काय खाऊं ? हत्तीघोडे खाऊं ?
— गोश्त खा. पुलाव बिर्याणी !
— गोश्त म्हंजे गोमांस. तें मी खात नाहीं.
— अच्छा ? तू हिंदू आहेस वाटतं ?
असा झगडा जवळजवळ रोजच चालायचा.
एक दिवस जमीरुद्दीन न् आणखी एकजण — सगळे टवाळखोर जमा झाले होते. माझी मनसोक्त टिंगल चालली होती.
जमीरुद्दीन म्हणाला — गोश्त खा न् वाजव. मच्छीके पानीसे कुछ नहीं होगा !
तिडिक डोक्यांत गेली माझ्या.
— सुवर का बच्चा ! काय ऐकायचंय — बोल ! बजाना नहीं होगा ? पायानं सरोद वाजवीन ! ऐकतोस ? सरस्वतीमाईचं वाद्य म्हणून पाय लावणार नाहीं. डाव्या हातानं वाजवतों ! ऐका !
जमीरुद्दीन म्हणाला — तूं असा हिंदूंच्यासारखा कां म्हणून बोलतोयस ?
— आम्ही हिंदूच तर होतों !
— काफिर !
किती म्हणून सहन करणार ?
तेव्हांपासून डाव्या हातानं तारेचीं वाद्यं वाजवतों. अन् चामड्याचीं वाद्यं उजव्या हातानं वाजवतों. थप्पड पण डाव्याच हातानं मारतों. बंगाली माणसाचा स्वभाव ! राजाला पण मारलं होतं ! बोट मुरगळून गेलं होतं राजाचं ! बंगाली तसा दिसतो शांत — पण रागावला तर बाँब फेंकतो.

तर ? संपल्या कीं माझ्या सगळ्या गोष्टी ! फार त्रास दिला तुम्हांला. युरोपची गोष्ट ? सगळंच सांगायला पाहिजे का काय ? तें परत कधींतरी बघूं या.

असंख्य गोष्टी. नाना लोकांच्याबद्दल, देशांच्याबद्दल. असं कांहीं बोलायचे — जें निव्वळ बोलायपुरतंच. शुभमयनं लिहून घेतांना एकपण शब्द गळूं दिला नाहीं. जें-जें बोलले, तें-तें त्यानं उतरवून घेतलं. फक्त एक — वयाचा हिशेब तेवढा वगळून टाकला. खाँसाहेब वय एकेका दिवशीं एकेक सांगायचे. त्याचा कांहींच मेळ बसायचा नाहीं. परत विचारलं तर म्हणायचे — आतां वय झालं ना ! हिशेब कांहीं लागत नाहीं !



मैफल तिसरी

उदय जाणार होता युरोपांत. नाचाचं टोळकं घेऊन. मला पण घेऊन जायचं त्यांच्या मनांत होतं.

मी म्हणालों – बाबा, तुम्ही लोक किती दिवस तिकडंच राहाल कोण जाणे. मला कांहीं वर्षभरापेक्षां जास्ती दिवस राहणं जमायचं नाहीं.

जानेवारी महिन्यांत भारतांतनं निघालों.

आमच्या टोळक्यांत उदयशंकर, रवींद्रशंकर, सिमकी, जोहरा बेगम, यहुदी मॅनेजर ग्राटा अन् आणखी आठदहाजण होते.

लहानपणापासून भटकायची हौस मला होतीच. संगीत शिकण्याकरतां न् देश बघण्याकरतां आठ वर्षांचं वय असतांनाच आईबापांना सोडून घरनं पळून गेलों होतों. जहाजांत चढल्यावर परत एकदां तें पोरवय आल्यासारखं वाटलं मला.

पण इकडं तर कांटा धरतां यायचा नाहीं. सुरी चालवतां यायची नाहीं. जहाजांत फार पंचाईत झाली. वयानं लहान असलेल्या मंडळींनीं झटपट शिकून घेतलं. उदय वगैरेंनीं युरोपांत बरेच दिवस घालवलेले. त्यामुळं त्यांना कांहींच अडचण नव्हती. पंचाईत फक्त माझीच होती. सगळ्यांच्याबरोबर जेवायला बसायचों. पण कांटा-चमचा चालवायच्या बाबतींत एकदम अडाणी ! काय करणार ? आमचे वाडवडील शस्त्रं चालवण्यांत पटाईत होते ! शिवाय खातांना तोंड जरासं जास्ती उघडलं किंवा उगा किंचित आवाज झाला कीं सगळे बिथरायचे. दुसरे प्रवासी – विशेषतः भारतीय – ते माझ्या ह्या वागण्यामुळं शरमेनं न् संतापानं लाल व्हायचे. मी कांहीं तें मनावर घ्यायचों नाहीं. निवांतपणानं मी आपलं जेवण उरकायचों. किती मोठमोठ्या हॉटेलांतनं न् साहेब लोकांच्या मोठमोठ्या पार्ट्यांतनं मीं आपलं असंच चालवून नेलं. जहाजांत काय, पॅरिसमधें काय न् डिव्हेनशायरला एल्महर्स्टच्या घरीं काय – सगळीकडे चार पैशाच्या कडुलिंबाच्या काडीनंच दांत घासले. बाथरूममधें साबण लावून स्वतःच्या हातानं गंजीफ्रॉक धुतला. झोंपतांना लुंगीच गुंडाळून घेत होतों. जेवायकरतां म्हणून वेगळा सूट कांहीं शिवला नाहीं. एकाच सुटावर सगळीं कामं उरकलीं. पण तेवढ्यावरनं कुणींच माझी हेटाळणी केली नाहीं. कार्यक्रमाच्या वेळीं आम्ही सगळेच धोतरझब्बा घालून असायचों.

युरोपातलं जेवणखाण मला अजिबात आवडलं नाहीं. तिकडं पाणी पीतच नाहींत – सारखं दारू घ्या ! मांस-मच्छी-भाजींत ना हळद, ना मिरची ! नुस्तं आपलं उकडून ठेवलेलं ! मी तर एरवींच मांसमच्छी खात नव्हतों. त्यांत परत युरोपमधल्या उकडलेल्या मांसमच्छीला भयंकर वास मारायचा. सगळ्याच पदार्थांना हा वास मारायचा. मला उलटी व्हायला यायची. बाकीचे अर्थात् ताव मारून खायचे. एक दिवस इंग्लंडमधें एका लॉर्डच्या घरीं एका मुलीनं कच्चं मांसच तोंडांत टाकलं. मला इतकी किळस आली ! म्हणालों – राक्षसी ! कच्चं मांस खातेस ! मला शिवूं नको आतां !

त्या पोरीला तर मीं बोललेल्या बंगालींतलं एकपण अक्षर समजलं नाहीं. उलट हे आपलं कौतुकच करत असतील असं तिला वाटलं. अन् ती चक्क माझ्या खांद्यावर चढून बसली. दाढी ओढायला लागली.

तरी इंग्लंडमधें चुरमुरे चांगले मिळायचे. ते आपले मी मूठमूठ तोंडांत टाकायचों. आमच्या टोळक्यांतले पण बरेचजण चुरमुरेभक्त बनून गेले. दूध न् दहींदेखील खूप चांगलं मिळायचं.

मला कांहीं त्यांची भाषा समजायची नाहीं. तरी त्याच्यामुळं खूप कांहीं गैरसोय झाली नाहीं. उदय-वगैरेंना फ्रेंच, जर्मन, इंग्रजी चांगलं यायचं. उदयच माझं दुभाष्याचं काम करायचा. बुडापेस्ट, विएन्ना, पॅरिसमधें खूप गुणी गायक-वादक गाण्याबजावण्याबद्दल चर्चा करायला यायचे. उदय मला न् त्यांना सगळं समजावून सांगायचा. तरी ह्यांची भाषा आपल्याला येत नाहीं म्हणून मला वाईट वाटायचं.

उदयबरोबरच मी सगळीकडं भटकायचों. तोच मला बरोबर घेऊन सगळं दाखवून आणायचा.

तिकडल्या हॉटेलांतले स्त्रीपुरुष नोकर फार चांगले होते. तल्लख होते. हातवारे करून मीं कांहीं समजावून दिलं कीं ते अचूक काम करायचे. एक दिवस तर एका हॉटेलांत मला भयंकर भूक लागली होती. मॅनेजरला फोन केला. पण भूक लागलीय हें त्याला समजावून सांगणं मला कांहीं केल्या जमेना. काय आरडाओरडा ! कांहींच समजत नसल्यामुळं मॅनेजर नुस्ताच

ओरडत होता. भिऊन मीं फोन बंद केला. लगेंच मॅनेजर तडक माझ्या खोलींत हजर ! मग मीं त्याला हातवाऱ्यांनीं सगळं समजावून दिलं.

मुंबईला जहाजांत चढल्यावर पहिल्यांदां लागलं पोर्ट सय्यद. जेरुसलेम, जाफा, एकार, स्मर्ना वगैरे शहरांतनं आमचे ' शो ' झाले. हॉल पुरायचा नाहीं इतकी लोकांची गर्दी. उदयचा नाच, आमचा कॉन्सर्ट अन सतार-सरोद सगळं बघून-ऐकून लोक मुग्ध होऊन जायचे. रोज वर्तमानपत्रांत आमच्या शोबद्दल चर्चा यायची अन् चित्रं यायचीं. उदयचं नांव तर ज्याच्या-त्याच्या तोंडीं झालं होतं. आम्ही बाहेर पडलों कीं आमच्याभोंवतीं गर्दी व्हायची. सगळे आमच्याकरतां जागा करून द्यायचे. मी म्हातारा, तर बस किंवा गाडींत चढतांना लोक हात धरून मला वर घ्यायचे. बसवायचे. एकदां एका बाईनं माझ्याकडं हात केला. माझ्यावर भारतांतले संस्कार. मीं आपला हात मागं घेतला. मागं सरलों. तशीं ती बाई आणखीच पुढं आली. शिवाय बाई चक्क पैलवान होती. पकडून ओढत तिनं बसमधें घेतलं. जागा करून देऊन बसवलं. नंतरसुद्धा असे कैक प्रकार झाले. पण मग मला कांहीं संकोच वाटला नाहीं. जेरुसलेमच्या लाटसाहेबानं आम्हांला एक जंगी मेजवानी दिली. त्यावेळीं त्यांनीं खूप चांगलं भाषण दिलं. भारताच्या संगीतांची न् नृत्याची खूप प्रशंसा केली.

पॅलेस्टाइनहून आम्ही गेलों इजिप्तला. पिरॅमिडच्या देशांत. नबाबाच्या बेगमा प्रत्येक शो बघायला यायच्या. अन् शो संपल्यावर खूप वेळ उदयकरतां थांबून राह्यच्या.

मला फार वाईट वाटतं – मक्का-शरीफला कांहीं आम्हांला जातां आलं नाहीं. मला जातां आलं असतं. पण आमच्या टोळक्यांतल्या मुसलमान नसलेल्या लोकांना कांहीं ते येऊं देणार नाहीत, म्हणून मग मी गेलों नाहीं.

तरी पॅलेस्टाइन, तुर्कस्तान, इजिप्तकडल्या मुसलमानांना बघितल्यावर एक गोष्ट माझ्या ध्यानांत आली कीं आपल्या देशांतल्या मुसलमानांच्यापेक्षां ते फार वेगळे आहेत. मुल्लांना लांब दाढ्या नाहींत. पण ते कुराण किती सुंदर पढतात ! आजान

किती सुंदर देतात ! जसा सुंदर उच्चार, तशीच हृदयांत भक्ति ! आपल्या देशांतल्या मुल्लांच्यावरनं वाटतं – इस्लाममधें संगीताला कांहीं स्थानच नाहीं बहुतेक ! पण त्या देशांत संगीताबद्दल अशी हेटाळणीची भावना नाहीं. तिकडं गांवांतलीं लहानलहान मुलंमुली किती सुंदर नाचतात-गातात ! उदयच्या प्रत्येकच नाचांत हिंदू देवदेवतांच्या गोष्टी. तरी सगळ्या थरांतल्या मुसलमानांना हे नाच बघून आनंदच झाला. अन् त्यांनीं मोकळ्या मनानं स्तुतीच केली. त्या लोकांच्या हृदयांतच गाणं आहे. अन् त्यांचा लंबाचवडा लाललाल सुंदर चेहरा, सुंदर पोषाख, वरच्या दर्ज्याचे संस्कार – आपल्या देशांतल्या मुसलमानांच्यापेक्षां ते कितीतरी जास्ती सुंदर, जास्ती मोठ्ठे आहेत. तिकडल्या बायका पण बुरखा टाकून पुरुषांच्या बरोबरीनं बाहेर काम करतायत. त्याहि चांगल्या तगड्या, निरोगी, अन् राबायची ताकद पण खूप. आपल्या देशांतल्या मुलांना एकदा अरबस्तान-तुर्कस्तानमधें फिरवून आणणं जर आपल्याला जमलं असतं, तर इथल्या पण मुसलमानांची परिस्थिति इतकी वाईट राहली नसती. दंगेबिंगे झाले नसते.

इजिप्तमधनं आम्ही गेलों ग्रीसमधें. ग्रीस म्हंजे खूप जुना देश. इजिप्त, भारत न् चीनच्या नंतर लगेंचच ग्रीसची संस्कृति जन्माला आलेली. किती मोठमोठे कवी, कलावंत न् पंडित ह्या देशांत जन्मलेले. ग्रीसमधें आम्ही महिनाभर होतों. हजारोंनीं माणसं उदयचा नाच बघायला यायचीं अन् वर्तमानपत्रांतनं किती चित्रं न् प्रशंसा !

तिथनं मग रुमानिया, बल्गेरिया, चेकोस्लोवाकिया, युगोस्लाविया, हंगेरी, ऑस्ट्रिया, पोलंड, स्वित्झर्लंड, बेल्जियम, स्वीडन, फ्रान्स – वगैरे देशांतल्या मोठाल्या शहरांतनं चार महिने कार्यक्रम चालले. सगळीकडंच प्रशंसा, सन्मान, राजेरजवाडे-मंत्री-प्रेसिडेंटांच्या मेजवान्या, वर्तमानपत्रांतनं चिक्कार चित्रं अन् थेटरांतनं लोकांची गर्दी. उदय स्टेजवर आला कीं टाळ्यांच्या कडकडाटानं थेटर डोक्यावर येत असल्यासारखं वाटायचं. फुलांच्या गुच्छांनीं स्टेज भरून जायचं. कार्यक्रम संपवून रात्रीं घरीं जातांना टोळक्या-टोळक्यांनीं लोक उदयला बघण्यासाठीं उभे असलेले

दिसायचे. युरोपमधें सगळीचकडे अशी गर्दी जमायची – एक लंडन सोडून !


व्हिएन्ना, पॅरिस, प्राग, बुडापेस्ट वगैरे शहरांतनं संगीताबद्दल न् कलेबद्दल विशेष कदर असलेली दिसली. ह्या प्रत्येक शहरांत खास संगीताकरतां म्हणून वेगळा म्युझिक हॉल होता. हॉल पण असा बांधलेला कीं कुठंहि बसलं तरी संगीताचा अगदी सूक्ष्म झंकार पण ऐकूं यावा. परत एकेका हॉलमधें दहाबारा हजार लोक मावायचे. गाणंबजावणं सुरू झालं कीं सगळीकडं शांत होऊन जायचं. फक्त उजेडाचा एक फिकट किरण माझ्यावर पडायचा. संबंध थेटर इतकं शांत असायचं कीं वाटायचं, आपण हिमालयांतल्या गुहेंत बसूनच वाजवतोंय. पण शेवटीं मात्र लोकांच्या आरोळ्या न् टाळ्या. लागोपाठ चारपांचदां वाजवायला लागायचं. तरी म्हणायचे, आणखी होऊं द्या. अशा श्रोत्यांच्यासमोर वाजवायला, त्यांच्याशीं संगीताबद्दल चर्चा करायला मला खूप उत्साह वाटायचा. तन्मय होऊन मी वाजवायचों. इतकं स्वतःला विसरून भारतांत पण कुठंच कधीं वाजवलं नव्हतं. माझं निर्जीव लाकडाचं वाद्य जिवंत होऊन जायचं. युरोपांतल्या श्रोत्यांच्यासमोर वाजवून मला जो आनंद झाला, तसा आणखी कुठंच मिळाला नाहीं.

पॅरिसमधें आम्ही एक्चेलिया हॉटेलमधें उतरलों होतों. जवळजवळ एक महिनाभर आम्ही तिथं होतों. भारतांतल्या सगळ्या वाद्यांचं एक प्रदर्शन तिथं भरवलं. आमच्याबरोबर बहुतेक सगळीं वाद्यं होतींच. खूप लोक हे प्रदर्शन बघायला यायचे. त्यांच्यांत मोठमोठे गवय्ये-बजवय्ये पण असायचे. कोणतं वाद्य कसं वाजवतात, नांव काय, सुरवातीपास्नंचा इतिहास काय – असं कायकाय एकेक कुतूहल त्यांना ! फोटो काढून घ्यायचे. भारताच्या संगीताबद्दल पॅरिसमधल्या मंडळींना प्रचंड उत्साह होता. आपलं संगीत मनांत खूप सूक्ष्म स्पंदनं उभीं करतं हे त्यांना जाणवायचं. हें सगळं बघून-ऐकून मला भारी आनंद व्हायचा. अन् अख्ख्या जगांतले ज्ञानी-गुणी लोक आपल्या संगीताचं मर्म एक दिवस ओळखतील – असं मला वाटायचं.

एक दिवस हॉटेलमधें कांहीं अमेरिकन न् युरोपियन तरुण मुली आल्या. त्यांना माझा सरोद ऐकायचा होता. अमेरिकन पोरी म्हणजे भारी गडबड्या. सध्यां त्यांच्याकडं ओरिएंटल म्युझिकची फॅशनच आहे, तर परत गेल्यावर ऐकलंय म्हणून सांगतां यावं म्हणून ऐकायचं असेल थोडंसं असं मला वाटलं. दुपारीं तीनचा सुमार होता. वैतागून मीं भीमपलास सुरूं केला. सुरवात केल्याकेल्याच दिसलं, कीं नाहीं, ह्या कांहीं तशा मुली नाहींत. खूप मन लावून ऐकतायत. सुराच्या आंत शिरायला पहातायत. फार बरं वाटलं. तन्मय होऊन मीं तीन तास वाजवलं. सहाच्या सुमाराला मीं डोळे उघडले तर त्या सगळ्या पोरी एका जागीं गप्प बसून राहलेल्या न् त्यांच्या डोळ्यांतनं आंसवांच्या धारा लागलेल्या. रडणं थांबायचं कांहीं लक्षणच नाहीं. गळा दाटून आलेला. दुसऱ्या क्षणीं धावत येऊन त्यांनीं मला मिठी मारली न् त्या माझ्या कपाळाचीं चुंबनं घ्यायला लागल्या.

युरोपमधें संगीताच्या खूपच जाणकारांशी चर्चा झाली. आपल्या संगीताबद्दल त्यांना खूप माहिती करून घ्यायची असायची. रागरागिण्याच्या आंतमधें काय भाव आहे, वगैरे मी त्यांना समजावून द्यायचों. तुम्हीं स्वतः कांही कंपोज केलंय का नाहीं असं ते हटकून विचारायचे. आतां भारतांतल्या रागरागिण्या तर कांहीं युरोपांतल्यासारख्या कुणीं कंपोज केलेल्या नाहींत. मागं कोणत्या युगांत कोण जाणे, देवाकडनं ऋषींना त्या मिळाल्या हें मी त्यांना सांगायचों.
सांगायचों, दिवसाच्या एकेका प्रहराकरतां एकेक रागरागिण्या आहेत. त्यांच्या आंतमधें वेगवेगळा भाव असतो. संगीतांतनं आपल्याला मनाचे कितीतरी भाव व्यक्त करतां येतात. भाषेची जरूर पडत नाहीं. तारेच्या झंकारांतनंच भाव व्यक्त करतां येतो अन् तो ऐकणाऱ्याला नीट समजतो पण. ह्या सगळ्या गोष्टी त्यांना सरोद वाजवून वाजवून समजावून द्यायचों.
एक दिवस बुडापेस्टला संगीताच्या जाणकार मंडळींचं एक टोळकं आलं. तुम्हांला काय म्हणायचंय तें सरोद वाजवून समजावून द्या — म्हणाले. संध्याकाळचे पांच वाजले होते. आणखी तीनच तासांत

तिन्हीसांज होणार. मीं भैरवी सुरूं केली.
भैरवी संपल्यावर मीं विचारलं — काय लक्षांत आलं तुमच्या ?
एकजण म्हणाला — चर्चमधें बसून प्रेअर करत असल्यासारखं वाटलं.
दुसरा म्हणाला — पहाटें एकटा बसून प्रभूची उपासना करत असल्यासारखं वाटलं.
मग एकामागोमाग एक पहाटेपासनं रात्रीच्या शेवटच्या प्रहरापर्यंत हरेक वेळच्या वेगवेगळ्या रागरागिण्यांचे आलाप त्यांना ऐकवले. आपल्या संगीतांत वेळेचे वेगवेगळे भाव व्यक्त करतां येतात हें सगळ्यांनींच कबूल केलं.
भीमपलासबद्दल एकजण म्हणाला — ह्या सुरावटीनं भारी रडूं येतं. तुमच्या संगीतांत इतके करुण सूर कसेकाय निर्माण करतां आले ? कां म्हणून इतकं रडूं येतं ?
आपल्या संगीतांत सात सुरांच्या बावीस श्रुती. एकवीस मूर्छना. ' सा 'पासनं ' रे ' — एवढ्यांतच चार घाट. ह्या चार श्रुती आपल्याला वेगवेगळ्या पकडतां येतात, त्याच्यावर विश्वास ठेवायला कांहीं ते तयार होईनात. शेवटीं वाजवून दाखवल्या. तेव्हां आश्चर्यचकित होऊन ते म्हणाले — ध्वनींतले हे इतके सूक्ष्म फरक तुमच्या कानांना पकडतां येतात ?



म्हणालों – येतात ! म्हणून तर आमच्या रागरागिण्या इतक्या सुरेल आहेत ! त्यांच्यात तुटकतुटक न् विसंगत कांहीं आवाज होत नाहींत.

म्हणालों – तुमच्याकडं ताल न् टाइम तीन प्रकारचे. आमच्याकडं तीनशेसाठपर्यंत ताल आहेत !

चौताल, झपताल, सुरफाँक, धमार, आडाचौताल अन् आणखी कितीतरी ताल मीं त्यांना वाजवून दाखवले.

बुडापेस्टच्या त्या दिवशींच्या चर्चा करायला आलेल्या टोळक्यांत एक जगप्रसिद्ध व्हायलीनवादक पण होते. बोटं चालवायचं काय कौशल्य होतं त्यांचं ! प्रचंड वेग न् सफाई पण तितकीच ! पण त्याच्यांत मेलडी कांहीं तितकीशी नव्हती. चर्चा मात्र खूप रंगली होती. रात्रीचे बारा वाजून गेले. आमचीं सगळीं कामं, लोकांच्या भेटीगांठी – सगळं तहकूब होऊन गेलं. ते लोकदेखील आपलीं कामंधामं विसरून मन लावून, श्रद्धेनं चर्चा करत होते. त्यांच्याशीं त्या दिवशीं झालेल्या ह्या चर्चेनं इतका आनंद झाला म्हणून सांगूं !

युरोपमधें सगळीकडं असंच झालं.

फक्त बंगाली लोकांनाच गडबडधांदल आवडते असं नाहीं. युरोपांतले लोक पण गडबड करण्यांत पटाईतच आहेत. पण त्यांच्यांतल्या बऱ्याच संगीतज्ञ, कवी, कलाकार, रसिकांनीं आपल्या संगीताचं मर्म मनोमन ओळखलंय. एक-ना-एक दिवस युरोप आपल्या संगीताचा सन्मान करेलच करेल !

मला मात्र कांहीं त्यांचं गाणं आवडलं नाहीं. भारी कर्कश न् फार आरडाओरडा ! आत्तां मारामारी सुरू करतात वाटतं ! काबुली लोकांच्या गाण्याच्याहि वरताण !

म्युनिक म्हणजे संगीताचाच देश. तिथंहि गेलों होतों. पण म्युनिक न् बर्लिनमधें आमचा यहुदी मॅनेजर घाबरून गेला होता. त्यामुळं आमचा एक पण शो होऊं शकला नाहीं. पण हॉटेलांत येऊन बरेच लोक ऐकायचे. हॉटेलांत पण शो झाला नाहीं. ॲबिसिनियांत तेव्हां लढाई चालली होती. पैसे देशांतनं बाहेर घेऊन जायला परवानगी नव्हती. आम्ही रोम, फ्लॉरेन्स, व्हेनीस – सगळीं शहरं बघून घेतलीं. रशियांत जायची पण परवानगी मिळाली नाहीं.

मी आमच्या टोळक्याच्या पुढंच भारतांत परतलों. जर्मनींत पण शो होणाराय, यहुदी मॅनेजर कांहीं आतां नाहीं अन् तिथनं सगळे अमेरिकेंत जाणारायत – असं पत्र आलं होतं रवीचं.

इंग्लंडमधें आम्ही खूप दिवस होतों. सलग तीन महिने. गुरुदेव रवींद्रनाथांचे शिष्य एल्महर्स्ट. त्यांनीं ह्या गुरुदेवांच्या आश्रमासारखाच अन् तोच आदर्श पुढं ठेवून डिव्हेनशायरमधें एक आश्रम उघडलाय. त्याचं नांव होतं व्हर्टिंग्टन हॉल. तिथं पण आम्ही गेलों होतों. तिथं इथल्यासारखींच लहानलहान मुलंमुली खूप. त्यांच्यांत गेल्यावर मला जरा जिवांत जीव आल्यासारखं वाटलं. माझ्याशीं त्यांची अगदी गट्टी जमून गेली. खांद्यावर चढून दाढी ओढून, चापट्या न् बुक्के मारून अन् पापे घेऊन त्यांनीं खूप धांदल उडवून दिली.

परदेशांत आपण एक वर्षभरच राहूं, असं उदयला सांगूनच मी त्यांच्याबरोबर गेलों होतों. वर्षअखेर परतलों. आमच्या आधीं तिमिरवरण युरोपमधें जाऊन मैफल गाजवून आला होता. तो माझाच विद्यार्थी. युरोपमधें ठिकठिकाणीं त्याची प्रशंसा ऐकून भारी आनंद झाला. अभिमान वाटला. माझी स्वतःची तशी साधना नाहीं. सुरांची सृष्टी उभारून श्रोत्यांच्या मनाला भुरळ घालणं कांहीं मला जमत नाहीं. राजा विक्रमादित्य मध्यरात्रीं दीपक रागिणी वाजवायचा. दिवे लागायचे. रागरागिण्यांच्या मदतीनं हिंवाळा, वसंत, वर्षा असे ऋतू तो बोलवून आणायचा. माझी साधना नाहीं, त्यामुळं दिवेहि पेटवतां येत नाहींत, वसंत पण आणतां येत नाहीं. पण ह्या अपुऱ्या विद्येच्या बळावरदेखील माझ्या वाजवण्यानं युरोपकडनं कौतुक करून घेतलं. तेव्हां ह्याच्याचवरनं आपल्या संगीताचं काय प्रचंड मोठेपण आहे हें आपल्या ध्यानांत येईल. माझी साधना पुरी असती, तर आपल्या संगीताचं जें रूप मला दाखवतां आलं असतं, त्यानं सबंध पश्चिमेची सुसंस्कृत मंडळी दिपून गेली असती.

युरोपांत मीं बरंच कांहीं बघितलं. तेव्हां जर्मनींत हिटलर होता. इटालींत मुसोलिनी होता. चोहींकडं लढाईची भीति. मला राजकारण कळत नाहीं. पण अरबस्तान-पॅलस्टाइनपासनं ते युरोपमधें सगळीकडं आधुनिक संस्कृतीची ओळख झाली. आपला देश तेव्हां दारिद्र्यानं, अडाणीपणानं किती मागासलेला होता !


हिंदू-मुसलमानांचे झगडे, ब्राह्मण-शूद्रांत शिवाशिवीची मनाई – असा आंधळेपणा ! अन् त्याचवेळीं पश्चिम संस्कृतीनं, शिक्षणानं, ज्ञानानं किती पुढारलेली ! कोण म्हणतं युरोप यांत्रिक संस्कृतीचा गुलाम आहे म्हणून ? जडवादी आहे म्हणून ? आपल्या ज्ञानविज्ञानाच्या मदतीनं त्यांनीं माणसाची आध्यात्मिक ताकद पण वाढवलीय. तिथं माणूस माणसासारखं जगायला शिकलाय अन् इकडं आम्ही निर्जीव तामसिकतेमधें बुडून गेलोंय !

मी म्हातारा माणूस. जुना झालों आतां. युरोपमधच्या स्त्रीपुरुषांचं वागणं कांहीं आपल्याला आवडायचं नाहीं असं वाटलं होतं मला. पण स्वतःच्या डोळ्यांनीं बघितल्यावर गैरसमज दूर झाला.

कांहीं चारित्र्य नसलेलीं माणसं इकडं-तिकडं दोन्हीकडं आहेतच. पण आम्ही ज्यांना भेटलों, ज्यांच्यात मिसळलों – त्यांनीं युरोपबद्दलची माझी समजूत पार पालटून टाकली. युरोपबद्दल माझ्या मनांत श्रद्धेचीच भावना उभी राह्यली. एल्महर्स्टची मुलगी ब्रिआत्रिस न् शिवाय एलिस बोनर – ह्या देवीसारख्या आहेत ! भारताबद्दलची त्यांची आंतरिक श्रद्धाभक्ति बघून आश्चर्यानं थक्क व्हायला होतं.

आम्हांला युरोपमधें जें कांहीं दिसलं, त्यांत कुरूप असं कांहींच नव्हतं. तिथं मुलामुलींचं निर्बंध मिसळणं, पोहणं, समुद्रकिनाऱ्यावर उन्हांत पडून राहणं, खेळ, नाचगाणीं – कांहींसुद्धां खटकलं नाहीं. सगळं अगदीं सहज, सरळ न् सुंदर वाटलं.

तिकडच्या बायका पण जशा कामांत चटपटीत, तशाच शिकण्यांत-बिकण्यांतदेखील हुशार ! हॉटेलांतल्या मोलकरणीदेखील डोक्यानं आपल्याकडल्या बऱ्याच आय-ए किंवा बीएच्या पातळीवर ! फुरसत मिळाली कीं त्या पुस्तकं वाचतात. वर्तमानपत्रं वाचतात. घाम गाळून राबायची पण चांगलीच संवय ! अर्थात् आपल्याकडच्या घरांतल्या बायका न् मोलकरणी जितकं काम करतात, तितकं त्यांना राबावं नाहीं लागत. पण अंगापिंडानं – म्हंजे चांगल्या शब्दांत सांगायचं तर – धडधाकट, एरवीं महिषमर्दिनी पण म्हटलं तरी चालेल ! इथं कुणी नाहीं ना तसं ? म्हणून तर आपल्या कर्तबगारीनं सबंध जगाचा गाडा चालवतात. त्यांचीं पोरंबाळं पण काय सुंदर ! परीच्या मुलांसारखीं ! देवशिशु !



युरोपांतल्या बायकांची एवढी स्तुति करतोंय मी—आपल्याकडच्या आयाबहिणी रागावतील. पण माझं आयुष्य आतां पाऊण गेलं न् पाव राह्यलं. म्हातारा झालों मी. अन् त्या तर सगळ्या मला नातीसारख्या.

युरोपांत सगळ्यांनाच आपल्या देशाबद्दल कुतूहल. महात्मा गांधी, रवींद्रनाथ सगळ्यांनाच ठाऊक. आमची ज्यांच्याशीं ओळख झाली, ते सगळेच गुरुदेवांचे मोठे भक्त. एक लंडनमधेंच तेवढं आपल्या देशाबद्दल इतकं कुतूहल दिसून आलं नाहीं.

देशांत परतल्यावर आधीं काशीजवळ एका ठिकाणीं नृत्य-गायनाची शाळा काढावी असं उदयनं ठरवलं. नंतर शाळा अलमोड्याला निघाली. ह्या शाळेकरतां एलिस बोनर न बिआत्रिसनं उदयला खूप मदत केली होती. नाचाचे कार्यक्रम करून उदयला परदेशांत खूप पैसे मिळायचे. पण सगळ्या टोळक्याचा खर्च उरकल्यानंतर हातीं कांहींच राह्यचं नाहीं. बिआत्रिसनं कांहीं लाख रुपये अन् रेकॉर्ड्स, वाद्यं, कपडे, सजावटीचं सामान – कायकाय एकेक दिलं होतं. ते सगळं माझ्याबरोबरच भारतांत आलं. बिआत्रिस न् बोनरनं उदयाला इतकी मदत केली कीं सांगणं कठिण. आपल्या देशांतल्या कला न् संस्कृतीबद्दल त्यांना बेहद्द भक्ति होती. उदयच्या टोळक्याच्या परदेशाच्या वारींत त्यांची पण फार मदत होती. उदयखेरीज आणखी कितीतरी संस्थांना त्यांनीं मदत केली होती.

मी वर्षभर बाहेर होतों. त्या काळांतला माझा पगार मैहारच्या राजेसाहेबांनीं एकूणएक चुकता केला. माझ्या कुटुंबियांची देखभाल करण्याकरतां त्यांनीं जी मेहनत घेतली, ती दिवाणाच्यादेखील वांट्याला येत नसेल.

मला अक्कल फारशी नाहीं. शिक्षण तर नाहींच. युरोपांत कायकाय एकेक पाह्यलं होतं, त्याचं वर्णन करायची कुवत माझ्यांत नाहीं. फक्त संगीताबद्दलच तेवढं माझ्या मोडक्यातोडक्या भाषेंत थोडंसं सांगितलं. उठतों आतां. रात्र झाली.

हें सगळं सांगितलं तें कांहीं माझं चरित्र सांगावं म्हणून नाहीं. तुम्ही लोक पहा कीं संगीताच्या साधनेंत किती कष्ट घ्यावे लागतात !

आधींचे
प्रास

अरुण कोलटकरच्या कविता
JEJURI
अरुण कोलटकर

कुलवृत्तांत
वृंदावन दंडवते

आगामी
प्रास

बळवंतबुवा
अरुण कोलटकर

समुद्र
वसंत दत्तात्रय गुर्जर

रस्त्याचं वारं
मधु सावणे

संगीत दुष्टचक्र
वृंदावन दंडवते

अंतर्वेधी
मनोहर ओक

खंड्या
दुर्गा भागवत

आगामी
अनुप्रास

जेजुरी
अरुण कोलटकर

इसम
गौरकिशोर घोष

आर्थिक विकासाचीं पाळेंमुळें
ई. एफ. शुमाखर

पळशीची लढाई
तपनमोहन चट्टोपाध्याय